# अर्थबोध पत्रिका

अंक - ६ नोव्हेंबर १९९९

महत्त्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयांवरील माहिती सर्वांपर्यंत पोचवणारे माध्यम

---

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

(केवळ खाजगी वितरणासाठी)

## अर्थबोध पत्रिकेविषयी ...

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेतर्फे "अर्थबोध पत्रिका" हे आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन, नोव्हेंबर १९९८ पासून प्रकाशित करण्यात येत आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे मांडणे, तसेच विविध समस्यांच्या संदर्भातील सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी सोप्या शब्दांत देणे, हे या पत्रिकेचे उद्देश आहेत.

स्वतंत्र लेखनाबरोबरच, संकलित लेखनही अर्थबोध पत्रिकेतून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. विशेषतः अनेक विषयांवरील सखोल माहिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख छापणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशा माहिती व विश्लेषणाच्या आधारे लिहिलेल्या लेखांचा 'पत्रिके'त समावेश असेल.

अर्थबोध पत्रिकेच्या नियोजित अंकांपैकी हा सहावा अंक आहे. जानेवारी २००० पासून अर्थबोध पत्रिकेचे दुसरे वर्ष सुरू होईल.

आम्हाला आजपर्यंत वाचकांचा व वेगवेगळ्या संपर्क माध्यमांचा मिळालेला प्रतिसाद पाहून, पुढील वर्षात जमल्यास सहाऐवजी बारा अंक काढावेत असाही संस्थेचा मानस आहे. पुढील वर्षापासून अर्थबोधपत्रिका विनामूल्य नसेल, पण त्याचे अगदी नाममात्र इतके म्हणजे, सहा अंकांना पन्नास रुपये, याप्रमाणे देणगीमूल्य आकारले जाईल. देणगी मूल्य व अर्जासाठी शेवटचे पान पहावे.

**अर्थबोध पत्रिका : अंक ६ : नोव्हेंबर १९९९** **देणगी मूल्य : १० रु.**

**संपादक** : रमेश पानसे - **संपादन सहाय्यक** : राज्यश्री क्षीरसागर

**प्रकाशक** : भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

**मुद्रक** : एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता** : संपादक, अर्थबोधपत्रिका, 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.

# अर्थबोध पत्रिका

**अंक - ६** **नोव्हेंबर १९९९**

महत्त्वाच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक
विषयांवरील माहिती सर्वांपर्यंत पोचवणारे माध्यम

---

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६.
फोन : ५६५७१३२ / ५६५७२१०

(केवळ खाजगी वितरणासाठी)

आपण 'अर्थबोध पत्रिका' वाचण्यास
उत्सुक आहात काय?
मग
**या अंकाचे शेवटचे पान पाहण्यास विसरू नका !**

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय | १ |
| २. | नवे भूभागीय राजकारण | २ |
| ३. | श्रीमंत राष्ट्रे, गरीब राष्ट्रे | १५ |
| ४. | महाराष्ट्राची भूजल परिस्थिती | २१ |
| ५. | अबला सबला झाल्या | २५ |
| ६. | स्वदेशी : धोरण ? नव्हे जीवनशैली ! | २८ |

---

**सूचना** -

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे.
- अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रांत प्रसिद्ध करू शकता. फक्त लेख संपल्यावर 'अर्थबोधपत्रिका - भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी च्या सौजन्याने' अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.
- लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठवावा ही अपेक्षा आहे.

# • निवेदन •

भारताच्या सध्याच्या आर्थिक, राजकीय, व सामाजिक परिस्थितीसंबंधीच्या विषयांच्या विविध पैलूंची माहिती व ज्ञान सर्वसाधारण वाचकाना करून देण्याच्या उद्देशाने भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने पुस्तिका प्रकाशनाचे काम हाती घेतले आहे. लोक शिक्षणासाठी केलेल्या या प्रयत्नामुळे सुजाण व विचारी समाज घडण्याला हातभार लागेल असा विश्वास वाटतो.

या मालिकेत पुढील पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या आहेत -

(१) भारतातील लोकसंख्या वाढीचा प्रश्न
*लेखिका - कुमुदिनी दांडेकर*

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण (इंग्रजी पुस्तिका)
*लेखक - जयकुमार अनगोळ*

(३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण - मराठी अनुवाद
*लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - रमेश पानसे*

प्रत्येक पुस्तिकेची किंमत ३०/- रुपये आहे. पण 'अर्थबोध पत्रिके'च्या सभासदाना ती २५/- रुपयांमध्ये देण्यात येईल. पुस्तिकेची किंमत चेक / ड्राफ्ट/ मनी ऑर्डर द्वारे पाठवावी. चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' या नावाने काढावा. पुण्याबाहेरील चेकमध्ये १५/- रुपयांची रक्कम वटणावळीचा खर्च म्हणून समाविष्ट करावी. मनी ऑर्डर करताना मजकुराच्या जागी आपले संपूर्ण नाव व पत्ता लिहावा.

**चौकशीसाठी पत्ता**

संचालक
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट रोड,
पुणे - ४११ ०१६.

# संपादकीय

अर्थबोधपत्रिकेच्या पहिल्या खंडाचा (जानेवारी ते डिसेंबर १९९९) हा शेवटचा म्हणजे सहावा अंक. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने असा निर्णय घेतला होता की सुरवातीस सहा अंक काढून लोकांचा प्रतिसाद अजमवावा. आणि यासाठी हे सहा अंक वाचकांना विनामूल्य द्यावेत. अशातऱ्हेचे एक नवे नियतकालिक सुरू करताना त्यामागे काही हेतू होते. एक म्हणजे, आपल्या जीवनाशी निगडित अशा अनेक विषयांवर बरीच माहिती, माहितीचे विश्लेषण, त्यातून नवे विचार इंग्रजी भाषेतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियतकालिकांतून, पुस्तकांतून, अहवालांतून प्रसिद्ध होत असतात. आपल्यापैकी अनेकांना ते सहजासहजी उपलब्ध होतेच असे नाही. ते उपलब्ध झाले तर आपल्या ज्ञानाच्या कक्षा खासच रुंदावतील. दुसरे असे की, अनेक अभ्यास ज्या तांत्रिक भाषेच्या आणि संदर्भीय आकडेवारीसह प्रसिद्ध होत असतात; ती बऱ्याच वाचकांना अपरिचितही असते; त्यामुळे अशा अभ्यासांकडे दुर्लक्षच होण्याची शक्यता असते. वाचकांना अशा अभ्यासांमधील लेखनतंत्रापेक्षा, या अभ्यासांच्या आशयात आणि निष्कर्षांत रस असतो. अशावेळी या बाबी त्यांच्या नजरेस सहजसोप्या भाषेत आणाव्यात, असाही एक हेतू होता. जगाच्या काना-कोपऱ्यात अनेक घटना घडत असतात. त्यांपैकी काही आपल्या एकूण जीवनावर दीर्घकालाने अथवा दीर्घकाल परिणाम करणाऱ्या असू शकतात. त्यांचे ज्ञान व आकलन होणे आवश्यक असते; अशावेळी ते आपल्यापर्यंत पोचावे असाही एक हेतू होता.

आत्तापर्यंत प्रसिद्ध झालेल्या सहा अंकांमधून हे सर्वच हेतू पूर्णांशाने साध्य झाले आहेत असे नाही. परंतु विशिष्ट दिशेने पावले टाकली आहेत हे वाचकांच्या लक्षात आले असेल. या अंकांना जो पत्ररूपी प्रतिसाद आम्हाला मिळाला आहे, त्याने हा प्रयत्न पुढे चालू ठेवण्याइतपत दिलासा आम्हाला खचितच मिळाला आहे. म्हणूनच, अर्थबोध पत्रिकेचा दुसरा खंड जानेवारी २००० पासून सुरु होईल. अंक विनामूल्य न देता त्यास नाममात्र वर्गणी असावी असेही आता ठरविण्यात आले आहे. चांगल्या वस्तूला नेहमीच ग्राहक मिळतात असा अनुभव आहे. अंक उपयुक्त ठरावेत असा आमचा प्रयत्न राहील, ग्राहक म्हणून तुमचा प्रतिसाद मिळावा अशी अपेक्षा राहील.

■■

# नवे भूभागीय राजकारण

जगात सध्या येणाऱ्या शतकाबाबत व तत्संबंधी विविध विषयांवरील चर्चा सुरू आहे. भविष्यात कोणकोणत्या क्षेत्रात कसकशा घटना घडू शकतील, त्याचे परिणाम काय होतील, याविषयी अभ्यास करण्यात येत आहेत. यासंदर्भात काही ठोकताळे बांधण्यात येत आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील काही प्रसारमाध्यमे यात आघाडीवर आहेत. 'द इकॉनॉमिस्ट' या, लंडन येथून प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिकाने (३१ जुलै ते ६ ऑगस्ट १९९९) नुकताच 'सर्व्हे ऑफ द न्यू जिओपॉलिटिक्स' प्रसिद्ध केला आहे. त्यात नव्या सहस्रकाच्या पहिल्या पन्नास वर्षात जगाचा राजकीय व भौगोलिक नकाशा कसा असेल याविषयी त्यांनी ऊहापोह केला आहे. जागतिक घडामोडींबाबत औत्सुक्य निर्माण करणाऱ्या या सर्वेक्षणावर हा लेख आधारित आहे.

'द इकॉनॉमिस्ट' ने सर्वेक्षणात विविध मतांचा विचार केला आहे. काही घटनांवरून अर्थ, अन्वयार्थ लावण्यात आले आहेत. त्यातून त्यांनी काही निष्कर्ष किंवा अंदाज व्यक्त केले आहेत. प्रथम आपण हे अंदाज जाणून घेऊन मग त्याबाबतच्या कारणमीमांसेचा विचार करू.

- एकविसाव्या शतकातील पहिली पन्नास वर्षे (म्हणजे २००१ ते २०५०) जागतिक राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार आहेत. या काळात जग संपूर्णपणे सुखी समाधानी नसेल. नवीन सत्ताकेंद्रे निर्माण होण्याच्या दृष्टीने काही घटना घडण्याची शक्यता आहे.

- ही सत्ताकेंद्रे किमान दोन ते कमाल सहापर्यंत असू शकतील. ही केंद्रे काही समान संस्कृतींनी बांधलेली असतील. या राष्ट्रांना परस्परांबद्दल सहानुभूती वाटली तरी त्यांच्यात लष्करी सहकार्य नसण्याचीही शक्यता आहे.

- सांस्कृतिक व भौगोलिक साधर्म्यामुळे काही राष्ट्रे एकत्र येऊ शकतील, पण ही राष्ट्रे पहिल्या क्रमांकाची सत्ताकेंद्रे होऊ शकणार नाहीत.

- याशिवाय अनेक राष्ट्रे अशी असतील की जी सर्वथा स्वयंपूर्ण असतील, ती कोणत्याच सत्ताकेंद्राच्या अखत्यारीत नसतील, पण त्या राष्ट्रांचे कोणी नुकसान केले किंवा त्या राष्ट्रांनी जर कोणाचे नुकसान केले, तर त्याचे परिणाम जगाला त्रासदायक ठरू शकतील.

- जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जग जवळ येत आहे व राष्ट्राराष्ट्रांमधील सीमारेषा पुसट होत आहेत, असे वाटत असले तरी प्रत्यक्षात

काही राष्ट्राराष्ट्रांमधील सीमारेषा गडद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे 'आम्ही' विरुद्ध 'तुम्ही' किंवा 'ते' असे गट निर्माण होण्याची शक्यता आहे.

- जग आहे तसेच राहील, तसेच राष्ट्राराष्ट्रांमधील मैत्री किंवा शत्रुत्व यात फारसा बदल होणार नाही असेही काहींना वाटते.

**लोकशाही व भांडवलशाहीची मूल्ये रुजणार**

या निष्कर्षाप्रत येण्याआधी, या पाहणीमध्ये, काही मतप्रवाहांचा विचार करण्यात आला आहे. फ्रान्सिस फुकुयामा यांच्या 'द एंड ऑफ हिस्टरी?' या 'नॅशनल इंटरेस्ट' या अमेरिकेतील मासिकात प्रसिद्ध झालेल्या लेखाच्या अनुषंगाने विचार मांडण्यात आले आहेत. उदारमतवादी लोकशाही व बाजाराभिमुख अर्थव्यवस्था या दोनच बाबींवर नवीन समाजव्यवस्था उभी राहू शकते, असे प्रतिपादन त्यांनी केले आहे. विज्ञान व तंत्रज्ञानातील नवनवीन शोधांचा या दोन बाबींवर परिणाम होणार नाही असे ते म्हणतात.

फ्रान्समध्ये जेन मॅरी युहेन्नो यांनी 'द एंड ऑफ द नेशन स्टेट' या लेखाद्वारे व ब्रिटनमध्ये रॉबर्ट कूपर यांनी 'द पोस्ट मॉडर्न स्टेट अँड द वर्ल्ड ऑर्डर' या लेखाद्वारे हाच विषय मांडला आहे. अमेरिकेतील इतर काही अभ्यासकांनी देखील असेच मत व्यक्त केले आहे. या सर्व अभ्यासकांनी वेगवेगळ्या भाषेत आपले मत मांडले असले व त्यांनी शब्दशः सारखी मते व्यक्त केली नसली, तरी या सर्व अभ्यासांमधून एक समान विचार दृष्टिस येतो, तो असा :

"साम्यवाद संपल्यानंतर खुल्या बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेला व लोकशाहीला स्पर्धकच उरला नाही. काही दिवसांनी आफ्रिका, आशिया येथील अर्थव्यवस्थाही स्पर्धायुक्त भांडवलशाहीच्या मार्गाने वाटचाल करु लागतील अशी परिस्थिती असेल. अर्थव्यवस्था जर बाजाराभिमुख असेल तर निर्णयप्रक्रिया ही बाजारातील घडामोडींवर आधारित राहील. या राष्ट्रांमधील राजकीय व्यवस्था लोकशाहीच्या मार्गाने नियमित निवडणुकांच्या मार्फत प्रस्थापित होईल. सर्वांचा मार्ग थोड्याफार फरकाने सारखाच राहील, त्यामुळे वैचारिक मतभेद मोठ्या प्रमाणावर होणार नाहीत. लोकशाहीवादी राष्ट्रे युद्ध करीतच नाहीत असे नाही; तथापि, जागतिक शांततेसाठी त्यांचे प्रयत्न असतात असे म्हणता येईल."

लोकशाहीवादी राष्ट्रांना युद्ध करावयाचे असेल किंवा युद्धासाठी इतर राष्ट्रांना मदत करायची असेल तर त्यांना त्यांच्या देशातील नागरिकांचा पाठिंबा मिळवावा लागेल आणि युद्ध आवश्यक आहे हे समजावून सांगावे लागेल. तसेच युद्ध जिंकण्याची शक्यता कितपत आहे, यावरही खुलेपणाने चर्चा व्हावी लागेल. समजा, अशी राष्ट्रे काही ना काही कारणाने युद्धात सहभागी झाली तर

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या संदर्भात नवीन नैतिकता आणतील तसेच लोकशाहीची मूल्ये इतरत्र रूजावी यासाठीच ते प्रयत्न करतील. लोकशाहीवादी राष्ट्रे बिगर लोकशाही असणाऱ्या राष्ट्रांच्या (मग ती बलाढ्य असली तरी) पुढेपुढे करीत नाहीत त्यामुळे कधीकधी यातून संघर्ष निर्माण होऊ शकतो, हा एक तोटाही येथे लक्षात घेतला पाहिजे.

लोकशाहीच्या प्रसारामुळे संबंधित राष्ट्रात पाश्चिमात्त्य जीवनशैली व नीतीमूल्ये लादली जातात अशी टीका लोकशाहीचे टीकाकार करतात. ही टीका काही प्रमाणात खरी असली तरी लोकशाही रुजण्यासाठी ही आवश्यक बाब नाही, असे लोकशाहीच्या समर्थकांचे म्हणणे आहे. असे काही विचार व नीतीमूल्ये लादली जाऊ नयेत, यावर बऱ्यापैकी एकमत असल्याचे आढळते. युरोप व अमेरिकेतील घटस्फोटांचे व विवाहबाह्य संबंधांचे वाढते प्रमाण, एकच पालक असणाऱ्या मुलांची वाढती संख्या, तेथील व्यसनाधीनता याची चीनी, मुस्लिम, जपानी व हिंदू नागरिकांना काळजी वाटते. तसेच व्यक्तिस्वातंत्र्याच्या अतिरेकामुळे 'समाज' हा महत्त्वाचा घटक मागे पडतो व सामाजिक अराजकता यातूनच निर्माण होते असे मत आशियातील हे नागरिक व्यक्त करतात. अर्थात असे होऊ नये यासाठी अनेकजण प्रयत्नशील असतातच तथापि याचा थेट संबंध लोकशाहीशी नसावा हे महत्त्वाचे आहे.

लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी साम्राज्यवादाचा आश्रय घेतला जात असल्याची टीकाही कधीकधी केली जाते. पण पूर्वीचा साम्राज्यवाद वेगळ्या प्रकारचा होता. उदाहरणादाखल असे म्हणता येईल की पूर्वी साम्राज्यवादाप्रमाणे 'क' व 'ख' या राष्ट्रांवर 'प' व 'फ' चा ताबा असे, ते या देशांचा कारभार चालवित असत. आता 'क' व 'ख' राष्ट्रांनी स्वतःच सरकार चालवायचे, आपले धोरण राबवायचे, व प्रशासकीय निर्णय घ्यायचे असे अपेक्षित आहे. यासाठी 'प' व 'फ' प्रयत्न करीत असतात, हा साम्राज्यवाद नाही, असे लोकशाहीचे समर्थक म्हणतात.

लोकशाहीचा प्रसार जसजसा होईल तसतसे आंतरराष्ट्रीय संबंधांचे आयाम बदलतील व आंतरराष्ट्रीय कायद्यातही काही नवीन स्वागतार्ह बदल होतील असा काहींचा अंदाज आहे. सर्वच देशांनी व्यापक व सारासार विचार केला तर एका नवीन पर्वाची ती सुरूवात असू शकेल.

### महायुद्ध टाळण्याचा प्रयत्न

लोकशाही प्रस्थापित होईल व महायुद्ध टाळण्याचा प्रयत्न अनेक राष्ट्रांतर्फे होईल याची कारणमीमांसा देताना 'द इकॉनॉमिस्ट'ने म्हटले आहे की पहिल्या महायुद्धाआधी युरोपमधील राष्ट्रांमध्ये 'आपण कुणीतरी विशेष' आहोत,

अशी भावना अतिशय प्रखरतेने निर्माण झाली होती. या तीव्र अस्मितेतून पहिले महायुद्ध झाले. 'हिटलर'चे आगमन हा पहिल्या महायुद्धाचा परिणाम म्हणता येईल. हिटलरमुळेच दुसरे महायुद्ध झाले. दोन महायुद्धांनंतर मात्र युरोपीय राष्ट्रांनी 'पुन्हा युद्ध नकोच' अशी भूमिका घेतली. त्याचा परिपाक म्हणजे युरोपियन महासंघाची निर्मिती होय. (या संदर्भात नेहमीच एक गैरसमज आहे की युरोपियन महासंघाच्या निर्मितीमुळे युद्ध होणार नाही. पण प्रत्यक्षात नेमके त्याच्या उलट घडले आहे.)

तसेच पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांच्या वेळी सामान्यतः परिस्थिती अशी होती की एका कुटुंबात जास्त माणसे असायची. बहुतेकांचा वेळ शेतात किंवा तत्सम शारीरिक मेहनतीत जात होता. अत्याधुनिक सुखसोयी व आजच्या आरामाच्या कल्पना त्या काळात फारशा नव्हत्या. त्यामुळे 'युद्ध' हे त्यांना एक आव्हान वाटू शकले. आता ही कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती बदलली आहे. युद्धाचे भीषण परिणाम, दूरचित्रवाणी व इंटरनेटमुळे आबालवृद्धांना माहीत झाले आहेत. आपल्या एका किंवा दोघा मुलांना कोडकौतुकात वाढविणारे आई-वडील आज त्यांना युद्धभूमीवर पाठविण्यास तयार होणार नाहीत तसेच संगणकाच्या युगात वातानुकुलित कक्षात बसणाऱ्या तरूण मुलांना काम, आराम व मौजमजा सोडून युद्धाचा पर्याय खचितच मान्य होणार नाही. विसाव्या शतकाच्या अखेरीस झालेल्या सामाजिक व आर्थिक बदलांचा परिणाम म्हणून युद्ध होणार नाही, असेही म्हटले जाते.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट जगात सर्वत्र व प्रामुख्याने पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये घडत आहे. ती म्हणजे, स्त्रियांचा राजकारणासह सर्वच क्षेत्रातील वाढता सहभाग. शस्त्रांस्त्रांचा वापर कोणासाठीही करण्यास स्त्रिया फारशा उत्सुक नसतात. त्यामुळे राजकारणात स्त्रियांची संख्या वाढली म्हणूनसुद्धा युद्ध होण्याची शक्यता खूप कमी राहील असा अंदाज आहे.

### महायुद्ध नाही, तरी संघर्ष अटळ

युरोपमधील आर्थिक घडामोडी पाहता त्या राष्ट्रांमध्ये राजकीय एकी होऊ शकेल, असे आत्ता वाटत असले तरी हे सर्व होण्यासाठी बराच कालखंड जावा लागणार आहे. साम्यवादी राष्ट्रांमध्ये भांडवलशाहीची मूल्ये रुजायला वेळ लागणार असला तरी या मूल्यांमुळे व बाजाराभिमुख अर्थव्यवस्थेमुळे होणारे फायदे हे या देशांच्या लक्षात आले आहेत. भांडवलशाहीत 'भांडवल' हे केवळ 'योग्य हातात' असून चालत नाही, तर त्या भांडवलाचा उपयोग बाजारातील गरजांप्रमाणे व्हावा असे अपेक्षित आहे. या सर्व कारभारात पारदर्शकता असणे

महत्त्वाचे आहे. लोकशाहीचेही असेच आहे. केवळ बहुपक्षीय निवडणुका म्हणजे लोकशाही नव्हे; तर विविध पक्षांना जनतेपर्यंत पोचण्याची मोकळीक असणे, विविध पक्षांनी आपले विचार नागरिकांपर्यंत पोचविणे व नागरिकांचे मत जाणून घेणे, सरकारला विरोध करण्याचे स्वातंत्र्य मतदारांना असणे ही लोकशाहीची मूल्ये मान्य व्हायला वेळ लागू शकतो. त्यामुळे खुली अर्थव्यवस्था, मुक्त बाजारपेठ व खऱ्या अर्थाने लोकशाही ही त्रिसूत्री जगात सर्वत्र कार्यान्वित होण्यासाठी एकविसाव्या शतकातील पहिली पन्नास वर्षे महत्त्वाची ठरणार आहेत. थोडक्यात असे की, मोठे युद्ध झाले नाही तरी आर्थिक व वैचारिक संघर्ष अटळ आहे, असे मत जाणकार व्यक्त करतात.

लोकशाही समर्थक व विरोधक यांच्यातील हा संघर्ष क्वचितप्रसंगी तीव्र स्वरुपाचा होऊ शकतो. याचे कारण असे, की पहिल्या महायुद्धामुळे हिटलरला सत्ता मिळाली. त्याच्या कल्पना व विचार यामुळे दुसरे महायुद्ध झाले. या दोन महायुद्धांच्यामधील कालखंड अशांततेचा होता. दुसऱ्या महायुद्धानंतर साम्यवादाने आपले हात-पाय सर्वत्र पसरले. सुमारे पन्नास वर्षे स्थिरावलेल्या या साम्यवादाची पाळेमुळे उखडायला विसाव्या शतकाची बरीच वर्षे खर्ची पडली. आता लोकशाही व बाजाराभिमुख अर्थव्यवस्था रुजायला एकविसाव्या शतकातील किमान पंचवीस वर्षे तरी लागतील आणि या काळात थोडाफार संघर्ष चालू राहू शकतो, हे गृहीत धरायला हवे. आता हा संघर्ष नेमका कशा प्रकारचा असेल याचे भाकित करता येणार नाही. पण या संघर्षातील एक लहानशी चूकही संपूर्ण जगासाठी अतिशय महागडी ठरू शकते.

या संघर्षातून काही नवीन सत्ताकेंद्रे निर्माण होऊ शकतात आणि जगाचे भूभागीय राजकारण (Geopolitics) क्षणार्धात बदलू शकते हा निष्कर्ष येथे महत्त्वाचा ठरतो. याच पार्श्वभूमीवर आत्तापर्यंत झालेल्या काही युद्धांचा मागोवा घेणे इष्ट ठरेल.

## इतिहासातील युद्धांकडे एक दृष्टिक्षेप

युद्धाची शक्याशक्यता पडताळून पाहत असतानाच यापूर्वी झालेल्या काही युद्धांची पार्श्वभूमी जाणून घेतली, तर असे आढळते की दोन भिन्न पद्धतींमधील किंवा व्यवस्थांमधील संघर्षामुळे युद्धाची ठिणगी पडते. पहिले महायुद्ध हे दोन निमलोकशाही राष्ट्रांमधील (ब्रिटन व फ्रान्स) आणि जर्मनी (अल्पलोकशाही) यांच्यातील संघर्षाचा परिणाम होता. पण हे युद्धदेखील युरोपमध्ये वर्चस्व कुणाचे असावे यावरून होते. याचा अर्थ असा की त्या त्या राष्ट्रात लोकशाही होती की नव्हती, हा प्रश्न तेव्हा एवढा महत्त्वाचा नसतो.

दुसरे महायुद्ध तर हिटलरमुळे (पुन्हा वर्चस्वाचा प्रश्न) व वैचारिक मतभेदांमुळे झाले हे जगाला ज्ञात आहेच.

उत्तर व दक्षिण कोरिया यांच्यात १९५० मध्ये झालेले युद्ध किंवा १९६० मध्ये उत्तर व दक्षिण व्हिएटनाम यांच्यात झालेला संघर्ष हा राजकीय व आर्थिक विचारसरणीतील मतभिन्नता यामुळेच झाला होता. काही वर्षांपूर्वी झालेले आखाती युद्ध व नुकतीच झालेली कोसावोची लढाई यांतूनही 'आम्ही' विरुद्ध 'तुम्ही' ही प्रवृत्ती युद्धाच्या मुळाशी असल्याचे स्पष्ट होते. आपण कुणीतरी वेगळे, ते कुणीतरी वेगळे, असे दोन्ही बाजूंना सारख्याच तीव्रतेने किंवा एका बाजूला अतितीव्रतेने जाणवत असते तेव्हाच युद्ध होते, असे या उदाहरणांवरून म्हणायला हरकत नाही. वेगळेपणाची ही जाणीव (किंवा अस्मिता) भविष्यात इतर राष्ट्रांना होणारच नाही असेही नाही, त्यामुळे संघर्षाची शक्यता नाकारता येणार नाही.

यासंदर्भात आपण चीनचा विचार करू. समजा, चीनची अर्थव्यवस्था साम्यवादाकडून भांडवलशाहीच्या दिशेने वाटचाल करतेय, तेथील सर्व तरुणांना नोकऱ्या आहेत, त्यांची कुटुंबे लहान आहेत. म्हणजे एक मूल किंवा पती-पत्नी दोघेच. आणि त्याचबरोबर स्त्रियांचा, राजकारणासह, सर्वच क्षेत्रातील सहभाग पुरुषांच्या बरोबरीने वाढला तर काय होईल? याचे उत्तर असे की चीन एकतर बलाढ्य होईल. याच उत्तरातून एक अर्थ असाही ध्वनित होतो की बलाढ्य झाल्यामुळे चीनमध्ये वेगळेपणाची जाणीव, अस्मिता, राष्ट्रवाद या गोष्टी वाढतील. या अस्मितेवर बारीकसा ओरखडा उठला तरी, म्हणजे रशिया किंवा भारताबरोबर सीमावाद उफाळला, तिबेटची अस्वस्थता वाढली, चीनमधील मुस्लिमांमध्ये असंतोष वाढला किंवा मध्यवर्ती आशियातील तेल व नैसर्गिक वायू यांवर नियंत्रण ठेवण्याबाबत प्रश्न निर्माण झाला तर चीनमधील बहुतांश जनता, (जी सधन असेल) १९१४ मध्ये सधन ब्रिटन व जर्मन जसे वागले (युद्ध हवे म्हणून) तशी वागेल. ब्रिटन व जर्मनीमधील तेव्हाच्या सधनवर्गाची नातवंडे व पतवंडे आता युद्ध नको म्हणतात तसे चीनच्या बाबतीत घडणार नाही. चीनमधील भावी युवकांना युद्ध हेच आव्हान व काहीतरी करुन दाखविण्यासारखे वाटेल. युद्धाच्या जबाबदारीतून मोकळे होण्यापेक्षा, त्यांना स्वतःच्या शिरावर ती जबाबदारी घ्यावीशी वाटू शकेल. आणि चीनबाबत अस्मिता व राष्ट्रवाद यासंदर्भात जे घडू शकते तेच (जिथे राष्ट्रवाद सुप्त आहे) अशा इतर राष्ट्रांच्या बाबतीतही घडू शकते.

यावरूनच असा अंदाज बांधता येतो की पहिले व दुसरे महायुद्ध ज्या भागात झाले त्या भागात आता युद्ध होण्याची शक्यता कमी आहे. पण युद्ध होण्यासाठी असलेली कारणे कुठल्यातरी राष्ट्रांमध्ये असतातच. त्यांचे समूळ उच्चाटन झाले नाही तर युद्ध किंवा संघर्ष कोणत्यातरी भूभागात होऊ शकतो. म्हणूनच एकविसाव्या शतकातील भूभागीय राजकारण महत्त्वाचे ठरणार आहे, कारण भावी जगाचा नकाशा त्यावरून ठरणार आहे.

## जागतिकीकरण झाले तरीही संघर्ष अटळ

जागतिकीकरणामुळे सर्व देश परस्परांशी जोडले जात आहेत. एक नवीन जागतिक अर्थव्यवस्था उदयास येत असून जगातील सर्व ग्राहकांचा त्यामुळे फायदा होतो आहे. तंत्रज्ञानातील शोधांमुळे व दळणवळणाच्या सोयींमुळे गाव, शहर, राष्ट्र, देश ही स्थानके मागे पडत आहेत. देशांच्या सीमा पार करुन जग जवळ येत आहे, त्यामुळे विकासाकडे, नवीन संगणकयुगाकडे वाटचाल करणारी ही राष्ट्रे युद्ध होऊ देणार नाहीत असा एक मतप्रवाह आहे.

जागतिक व्यापाराचा प्रचंड कारभार पाहता, 'राष्ट्राला' काही निर्णयप्रक्रियांत सहभागी होता येत नाही, खुल्या बाजारपेठांमुळे 'राष्ट्रांचे' नियंत्रण कमी होत आहे ही वस्तुस्थिती आहे. व्यापारासंदर्भात काही ठिकाणी 'राष्ट्रांचे' महत्त्व कमी झाले असले तरी जागतिकीकरणामुळे 'राष्ट्र', 'देश' किंवा 'सरकार' ही संकल्पना नष्ट होणार नाही असे मत जॉन बोल्टन या लेखकाने व्यक्त केले आहे. दिनांक १६ मे १९९९ च्या 'वॉशिंग्टन टाईम्स'मध्ये त्यांचा यासंबंधीचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात आपल्या विधानाच्या समर्थनार्थ त्याने काही मुद्दे मांडले आहेत. त्याचा पहिला मुद्दा आहे नागरिकांवर कर आकारणी करण्याच्या सरकारच्या अधिकाराचा.

नागरिकांकडून कर वसूल करून सरकारी खर्च (सीमांचे संरक्षण, शस्त्रास्त्र-खरेदी, विमा अशा प्रकारच्या बाबींवर) वाढविण्याचे विविध राष्ट्रांतील सरकारांचे हे धोरण काही महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश पाडणारे आहे. कर जास्त प्रमाणात वसूल करण्याच्या सरकारच्या निर्णयाला नागरिक विरोध करीत नाहीत याचा अर्थ लोकांना सरकारकडून मिळणारे विविध प्रकारचे संरक्षण (विमा, बेरोजगार भत्ता, वैद्यकीय मदत, सेवानिवृत्ती वेतन) हवे आहे. हे असे होते कारण माहिती, तंत्रज्ञान व पैसा यांचा प्रवास जगभर कुठेही होत असला तरी लोकांना आपले स्थान सोडायचे नसते, लोकांची स्थलांतर करण्याची तयारी असती तर स्वीडनच्या नागरिकांनी (स्वीडनमध्ये कराचे प्रमाण सर्वात जास्त आहे)

जपानमध्ये (जपान येथे कर अल्प प्रमाणात आहेत) स्थलांतर केले असते. याचा अर्थ बहुतेक सर्वच देशांच्या नागरिकांमध्ये 'आम्ही' व 'ते' या भावना असतात हे स्पष्ट होते. अपवाद वगळता 'आम्ही' 'त्यांच्यात' एकरुप होत नाहीत. तसे 'त्यांच्यातील' जास्त व्यक्ती 'आपल्यात' आलेल्या 'आम्ही'ना चालत नाहीत. म्हणजेच आपली पाळेमुळे कुठे रुजली आहेत याचे नागरिकांना भान असते असे म्हणता येईल.

दुसरा मुद्दा आहे आर्थिक धोरणाचा. खुल्या बाजारपेठेमुळे परदेशात भांडवलाची ने-आण करणे सोपे झाल्याने अर्थव्यवस्थेवर संपूर्णपणे नियंत्रण ठेवणे त्या त्या राष्ट्रातील सरकारांना शक्य होत नसले तरी सरकारांचा त्या संदर्भातील अधिकार पूर्णपणे संपुष्टातही आलेला नाही. अर्थसंकल्पीय धोरण किंवा चलनविषयक धोरण याद्वारे सरकार आपले उद्दिष्ट साध्य करु शकते.

तिसरा मुद्दा आहे लष्करविषयक धोरणाचा. देशाच्या संरक्षणविषयक बाबींमध्ये देखील सरकार आपले अधिकार राखून ठेवू शकते. पण संगणकीकरणामुळे आवश्यक ती गुप्तता राहत नाही असे लक्षात आले आहे. 'संगणकावरील फाईल्सची चोरी' करुन किंवा 'व्हायरस' सोडून शत्रुपक्षाला नामोहरम करता येणे अशक्य राहिलेले नाही. या परिस्थितीतही 'राष्ट्र' ही संकल्पना मोडीत न निघण्यामागे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे, ते म्हणजे, जेव्हा जेव्हा लष्कराचा वापर करण्याची वेळ येते तेव्हा, लष्कराला एका समान धाग्याने बांधून ठेवून समन्वय व संयोजन करणे हे फक्त 'राष्ट्रा'लाच (सरकारला) शक्य आहे. आणि जेव्हा जेव्हा वैचारिक संघर्ष संवादातून मिटणार नाही तेव्हा, लष्कराचा वापर करावाच लागणार आहे. त्यामुळे जागतिकीकरणाच्या आर्थिक बाजू लक्षात घेऊनही असे म्हणावे लागते की 'राष्ट्र' ही संकल्पना राहणारच.

अमेरिकेला प्रत्युत्तर देण्यासाठी किंवा युरोपीय राष्ट्रांची स्वतःची गरज म्हणून युरोपमधील राष्ट्रांच्या आर्थिक, राजकीय व भौगोलिक सीमारेषा पुसल्या जाण्याची शक्यता वगळता इतर देशांमधील सीमारेषा जागतिकीकरणामुळे पुसट होणार नाहीत, असे वाटते.

## सांस्कृतिक बाजूही महत्त्वाची

आंतरराष्ट्रीय संबंधांचा विचार करताना बहुतेकवेळा त्या त्या देशांच्या राजकारणाचा व अर्थकारणाचा विचार करण्यात येतो, मात्र सांस्कृतिक बाजू दुर्लक्षिली जाते. पण ही बाजू कळत नकळत एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते, असे मत व्यक्त केले आहे हार्वर्ड येथील एक प्रोफेसर सॅम्युएल हटिंग्टन

यांनी. नागरिकांच्या कृतीमागे आर्थिक व राजकीय दृष्टिकोण असतो, त्याप्रमाणेच एक सांस्कृतिक विचार किंवा ऊर्मी असते असे प्रतिपादन केले आहे.

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या संदर्भात १९९३ मध्ये, त्यांनी 'द क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन' या नावाखाली लिहिलेल्या लेखावर चर्चेचे मोहोळ उठले. त्यांना यासाठी बरीच टीकाही सहन करावी लागली. त्यांच्या लेखावरून तेव्हा अनेकांचा असा समज झाला की हटिंग्टन यांच्या मते, जगात फक्त सात-आठ संस्कृतीच टिकून राहणार आहेत. प्रत्यक्षात मात्र त्यांनी काही मोजकीच राष्ट्रे जगात महत्त्वपूर्ण भूमिका निभावतील, अशा आशयाचे लिखाण केले होते. येथे त्या वादात जाण्याचे प्रयोजन नाही. तथापि त्यांच्या लिखाणावरुन इकॉनॉमिस्टने केलेल्या पाहणीतून काही महत्त्वाचे मुद्दे पुढे येतात त्यांचा येथे विचार करु.

(१) *एकविसाव्या शतकात, आपण, संपूर्ण जगाचे म्हणजे एका मोठ्या कुटुंबाचे घटक आहोत अशी भावना बहुतांश राष्ट्रांमध्ये निर्माण होईल. या भावनेवर आधारित कृती त्यांच्याकडून घडत जाईल.* उदाहरणार्थ, कोसावो येथील युद्ध घ्या. कोसावोतील स्लाव्ह बांधवांवर सर्बियाच्या स्लाव्ह बांधवांकडून होणाऱ्या अत्याचाराबाबत रशियातील स्लाव्ह नागरिकांनी बराच काळ दुर्लक्ष केले होते. एखाद्या मुस्लिम व्यक्तीची मुस्लिमेतर व्यक्तीने हत्या केली तर इस्लामी राष्ट्रांमध्ये त्याविरुद्ध पटकन निदर्शने होतातच असे नाही, असे इकॉनॉमिस्टने म्हटले आहे. सॅम्युएल हटिंग्टन यांनी असेच म्हटले आहे की सांस्कृतिक व धार्मिक एकता व समानता असली तरी राजकीय व लष्करीदृष्ट्या तशी एकी असतेच असे नाही.

(२) *धर्माच्या नावावर, संस्कृतीच्या समानतेच्या नावाखाली नवे राजकीय ध्रुवीकरण होईलच असे नाही.* मुस्लिम समाज अनेक देशांमध्ये विखुरलेला आहे. अरब देश, मलेशिया, पाकिस्तान ही राष्ट्रे या धर्माच्या तत्त्वांचे पालन करतात. पण त्यांच्यात राजकीय एकी झालेली दिसत नाही. पश्चिमेकडील राष्ट्रांमध्ये वैचारिक दृष्टीने अनेक बाबींमध्ये साधर्म्य आहे. सांस्कृतिक व धार्मिक दृष्टीनेही ही राष्ट्रे परस्परांशी जवळीक साधून आहेत. त्यामुळे युरोपमध्ये जरी राजकीय एकी होण्याची शक्यता दिसत असली तरी अमेरिका व युरोप एकत्र येण्याची शक्यता नाही, असे वाटते.

(३) *सांस्कृतिक व धार्मिक जवळीक असणाऱ्या या राष्ट्रांमध्ये त्यांच्या त्यांच्या काही सीमारेषा असतात. त्यांच्यातील छोटे-छोटे समुदाय 'देश' म्हणून आपले वेगळे अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या प्रयत्नात असतात.* उदाहरणार्थ, एकाच संस्कृतीत जखडलेल्या अरब देशातील राष्ट्रे आपले 'वेगळेपण',

टिकविण्याचाच प्रयत्न करताना दिसतात. हे वेगळेपण एखाद्या छोट्या गोष्टीबाबत असले तरी ते अस्तित्व टिकविण्यासाठी पुरेसे ठरते. मोठ्या गटात सामावून हे वेगळेपण टिकविणे अवघड होऊ शकेल, म्हणून छोटे राष्ट्रसमुदाय एकत्र येण्यापेक्षा, आपले वेगळेपण जपण्याचा प्रयत्न करताना आढळतात.

(४) *अनेक राष्ट्रांमध्ये असलेल्या छोट्या छोट्या राज्यांमध्ये वेगळेपणाच्या जाणीवेत वाढ होऊन काही नवीन राष्ट्रे उदयास येण्याची शक्यता आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या राष्ट्रांची नाजूक स्थिती पाहता एकविसाव्या शतकात असे घडू शकेल.* उदाहरणार्थ, आफ्रिकेतील अनेक छोट्या राज्यांमध्ये वेगळेपणाची जाणीव निर्माण झाली आहे. इथिओपिया - इरिट्रीया, कांगो - अंगोला, नायजेरिया अशी काही उदाहरणे यासाठी पुरेशी आहेत. भारतातही काश्मीर व इतर काही राज्यांत अशा प्रकारचे प्रश्न आहेत. शिवाय येथील राजकारणात प्रादेशिकतेला महत्त्व प्राप्त झाले आहे, त्यामुळे अनेक पक्षांचे सरकार स्थापन होऊन तेथील नागरिकांना सतत निवडणुकांना सामोरे जावे लागले आहे. इतरत्र ही असे काहीसे घडले तर मग १९४५ पासून जेवढी राष्ट्रे आज अस्तित्वात आहेत त्यांच्या संख्येत वाढ होईल.

(५) *युरोपातील राष्ट्रांची राजकीय एकी होईल. अनेक राष्ट्रांमध्ये फुटीरतेच्या चळवळी सुरू असताना फक्त युरोपमध्येच राजकीय एकी होण्याची शक्यता दिसत आहे. अर्थात युरोपमध्येही हे 'घडणे' सोपे नक्कीच नाही. पण तशी शक्यता आहे हे खरे! युरोपमधील राष्ट्रांचे 'युनायटेडं स्टेट्स ऑफ युरोप' झाले तरी इतरत्र त्यांची पुनरावृत्ती होणार नाही, असेच वाटते.* या सर्व विश्लेषणावरुन 'सांस्कृतिक साधर्म्य' हा राष्ट्रांना एकत्र येण्याचा मुद्दा ठरु शकतो हे लक्षात आले, तरी संस्कृतीतील बारीकसे वेगळेपणही कळीचा मुद्दा ठरेल हे ही लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे जगाचे भूभागीय राजकारण नेमके कसे वळण घेईल हे सांगणे अवघड आहे.

## नव्या शतकाच्या पूर्वार्धात जगाचे चित्र कसे राहील ?

आत्तापर्यंत करण्यात आलेल्या विवेचनावरून नव्या शतकाच्या पूर्वार्धात जगाचे चित्र कसे राहील याबाबत आपल्याला काही ठोकताळे मांडता येतील. या काळात काही नवीन शक्तींचा उदय झालेला असेल. या शक्ती म्हणजे पूर्वेकडून पश्चिमेपर्यंत पसरलेली मोजकीच पण बलाढ्य अशी राष्ट्रे असतील. म्हणजे एक किंवा दोनच महासत्ता असे स्वरूप नसेल. यातील कोणत्या राष्ट्राकडे नेतृत्व असेल ते एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दहा वर्षांतील घडामोडींवर ठरेल. आता या घडामोडी कोणत्या ?

एक म्हणजे युरोप व अमेरिका यांची एकत्रित शक्ती किंवा एकट्या अमेरिकेची शक्ती. युरोप व अमेरिका यांच्यात सर्वदृष्टींनी (लष्करी व व्यापारविषयक) मैत्री कायम राहिली तर त्यांना आव्हान देण्याचे धाडस कोणतेही राष्ट्र करणार नाही. अशावेळी चीनची भूमिका काय राहील याचा अंदाज बांधणे कठीण आहे. दुसरे म्हणजे, जर युरोप व अमेरिका यांच्यातील मैत्री संपुष्टात आली तर अमेरिका जपानशी मैत्री करेल. अमेरिकेच्या तुलनेत युरोपकडे लष्करी सामर्थ्य कमी प्रमाणात आहे, त्यामुळे एकत्रित युरोपातील राष्ट्रेही अमेरिकेपुढे आव्हान उभे करणार नाहीत. 'नाटो' (North Atlantic treaty organisation - NATO) ची भूमिका येथे महत्त्वपूर्ण ठरणार आहे. 'नाटो' कमजोर झाल्यास अमेरिका कमजोर ठरेल पण 'नाटो' चे अस्तित्वच संपले तर युरोपची स्थिती विकलांग झाल्याप्रमाणे होईल.

तिसरी शक्यता अशी की चीन महासत्ता बनण्याचा प्रयत्न करेल. इ.स. २०२० मध्ये चीनचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न अमेरिकेच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा जास्त असेल असे अंदाज काही तज्ज्ञांनी व्यक्त केले आहेत. चीनमध्ये जर 'राष्ट्रवादा' ने उचल खाल्ली तर चीन एकट्या अमेरिकेला किंवा अमेरिका व युरोप यांना आव्हान देण्यास समर्थ होईल. चीनला आपले लष्करी सामर्थ्य कशाप्रकारे वाढवता येईल यावर चीनचे हे धोरण ठरेल. कदाचित सामर्थ्यवान चीन युद्धाद्वारे आव्हान देणारही नाही; पण चीनच्या बलाढ्यतेमुळे इतर राष्ट्रांची गणिते नक्कीच बदलू शकतात.

स्वतंत्र तैवानच्या मुद्यावरुन तैवानविरुद्ध लष्करी कारवाईचा विचार चीन करत असल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी (१६ ऑगस्ट १९९९च्या दरम्यान) भारतातील प्रसार माध्यमांनी दिले होते. याचा उल्लेख येथे महत्त्वाचा आहे. या वृत्तात असेही म्हणण्यात आले आहे की चीनने लष्करी कारवाईचा पर्याय स्वीकारला तर अमेरिका व इतर पाश्चिमात्य देशांची काय प्रतिक्रिया उमटेल, याचा अंदाज घेण्याचे काम, चीनच्या लष्कराशी संबंधित असलेल्या संशोधन पथकाला सांगण्यात आले आहे. दरम्यान तैवानला जास्त स्वातंत्र्य देणे म्हणजे मातृभूमीचे विभाजन होईल असे म्हणून चीनने तैवानचे अध्यक्ष ली-तेंगहुई यांच्या मागण्या फेटाळल्या आहेत. या प्रकरणी तैवानला गोपनीय माहिती देऊन व प्रगत आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रे पुरवून अमेरिका अनेक मार्गांनी तैवानच्या मदतीला धावून जाऊ शकते, असे मत चीन-अमेरिका दरम्यानचा व्यवहार पाहणारे तज्ज्ञ लोक व्यक्त करीत आहेत.

याचसंदर्भात आणखी एक महत्त्वाची बातमी दिनांक २ ऑक्टोबर १९९९ च्या भारतीय वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली आहे, तिचा ओझरता उल्लेख महत्त्वाचा ठरावा. माओने चीनमधील साम्यवादाच्या नव्या पर्वाला १ ऑक्टोबर १९४९ रोजी सुरूवात केली होती. त्या घटनेला १ ऑक्टोबर १९९९ रोजी ५० वर्षे पूर्ण झाली. म्हणून १ ऑक्टोबर १९९९ रोजी चीनने बीजिंग येथील निआनमेन चौकात चीनच्या लष्करी व आर्थिक ताकदीचे विराट दर्शन चीनी नागरिकांना व इतर देशांना घडविले. यावेळी चीनच्या नेतृत्वाने भविष्यात चीन आणखी बलाढ्य होईल व लोकशाहीच्या मूल्यांकडे वाटचाल करेल असा संदेश दिला. परराष्ट्रीय धोरणाबाबत ते म्हणाले की चीन साम्राज्यवादाला विरोध करेल व जगात एका राष्ट्राची नव्हे तर इतरही राष्ट्रांची म्हणजे बहुध्रुवीय सत्ता असावी यासाठी प्रयत्न करेल. यावेळी चीनने विकसित केलेल्या क्षेपणास्त्रांसहित लष्कराच्या इतर क्षमतांचे दर्शन जगाला झाले. यामुळे इतर राष्ट्रांच्या भूमिका कशा बदलू शकतात ते आता बघू.

चीनचे वाढते लष्करी व आर्थिक सामर्थ्य पाहून रशिया पश्चिमेकडील राष्ट्रांशी मैत्री वाढवेल. यासाठी नाटो व रशिया यांच्यातील करार-मदार महत्त्वपूर्ण ठरतील. यावेळी गरजेपोटी रशिया काही बंधने मान्यदेखील करु शकेल.

चीनचे सामर्थ्य विचारात घेऊन जपानदेखील अमेरिकेबरोबरचे आपले संबंध आणखी घट्ट करण्याच्या प्रयत्नात राहील. चीनचे भारताबरोबरचे संबंध पाहता, भारतदेखील जपानप्रमाणे अमेरिकेशी व पश्चिमेकडील राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध वाढविण्यास उत्सुक राहील.

मैत्रीच्या या नवीन राजकारणात, चीनला न घाबरता प्रत्येक राष्ट्र (रशिया, जपान, भारत) स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करीत राहील. भारत पाकिस्तानला त्याची जागा दाखवून देण्याचा प्रयत्न करील, त्यामुळे पाकिस्तान अरब राष्ट्रांशी मैत्री वाढवील. या परिस्थितीत सर्वांचीच नजर मध्य आशियातील 'तेलसाठे' यांवर खिळलेली राहणार आहे. त्यामुळे २०५० च्या सुमारास जगाचा केंद्रबिंदू 'मध्य आशिया' राहणार अशी लक्षणे आहेत.

ही बाब चीनच्या लक्षात आत्ताच आली आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांचा अभ्यास करणाऱ्या चीनमधील एका संस्थेच्या अधिकाऱ्याने मध्य आशियातून थेट चीनमध्ये तेल आणण्यासाठी पाईपलाईन बांधण्याची विनंती केली आहे. चीनला समुद्रामार्गे हे तेल अमेरिका व जपान सहजासहजी मिळू देणार नाही, हे चीनला माहीत आहे. त्यामुळे या मुद्यावरून संघर्ष निर्माण होऊ शकतो. चीनचे परराष्ट्र

धोरण कसे राहील यावर या संघर्षाची तीव्रता अवलंबून राहील. संबंधित सर्व राष्ट्रांनी अतिशय सावधपणे, सारासार विचार करुन निर्णय घेतले तर संघर्ष टाळता येणे शक्य आहे. पण हे होणे अवघड आहे. शीतयुद्धाच्या वेळी दोन्ही शक्ती परस्परांविषयी सावध होत्या, आपल्या निर्णयावर विरोधी पक्ष काय कृती करू शकेल याचा अंदाज त्यांना होता. आता असे अंदाज बांधणे कठीण होणार आहे. कारण हा संघर्ष भिन्नधर्मीय, भिन्न संस्कृतीतील असणार आहे. आणि दोन शक्तींच्या मध्ये अनेक छोटी-मोठी भिन्नधर्मीय, भिन्न संस्कृती असणारी किंवा संस्कृती साधर्म्य असणारी शक्ती स्थाने निर्माण होणार आहेत. विकासाच्या घोडदौडीत सर्वांचेच 'लक्ष्य' तेलसाठे म्हणजे मध्य आशिया असेल, त्यामुळे एकविसाव्या शतकाचा पूर्वार्ध भूभागीय राजकारणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे.

■■

## *पुस्तकांचे वाचन*

भाषा हे प्रगल्भ मानवाने विकसित केलेले शास्त्र आहे. भाषेतील प्रत्येक शब्द हा सांकेतिक असतो. म्हणून प्रत्येक संकेताचा प्रत्यक्ष अर्थ लावतालावताच भाषा समजते. ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. भाषा जेव्हा लिखित स्वरूपात कागदावर येते तेव्हा ही गुंतागुंत अधिकच वाढलेली असते. कारण लिखित अक्षर हे भाषेतील सांकेतिक ध्वनीला दुसऱ्या सांकेतिक चिन्हांत कागदावर आणते. म्हणजे वाचताना तुम्हाला दोन कोडी सोडवावी लागतात. पहिले म्हणजे कागदावर उतरलेले सांकेतिक चिन्ह कोणत्या ध्वनीशी निगडीत आहे आणि दुसरे म्हणजे तो ध्वनी अथवा शब्द वास्तवातील कोणत्या अर्थाचा संदेश देतो. कोडे सुटले की माणसाला समाधान वाटते. दृश्य माध्यम् आपल्या कल्पनाशक्तीला फारसा वाव देत नाही. कॅमेऱ्याने दाखविला तोच पर्वत. कॅमेरा दुसरी कल्पना करायला वावच देत नाही. परंतु पुस्तकात 'पर्वत' हा शब्ध वाचताच त्या शब्दाचा संकेत देणाऱ्या अर्थाच्या अनेक प्रतिमा वाचकांच्या कल्पनाशक्तीचे निर्माण होतात. लिखित शब्दाची ही सर्वात मोठी जादू आहे. म्हणूनच पुस्तकांचे वाचन हा अवर्णनीय आनंद तर असतोच, पण आत्मिक व बौद्धिक समाधान देणाराही प्रकार असतो. पुस्तके आपल्या मनाप्रमाणे आपल्याला हव्या त्या वेगाने वाचता येतात. हवे ते पान काढून मागे जाता येते, पुढे जाता येते, वाचता वाचता वाटल्यास पुस्तक व डोळे मिटून वाचलेल्या मजकुरावर हवा तेवढा वेळ चिंतन करता येते. एखादा मजकूर आवडला तर तो वाचून मनात रिचवता येतो. पुस्तके शिकवितात तशी करमणूकही करतात. एखादे पुस्तक घरी असले की घरात वडीलधारे माणूस असल्यासारखा त्याचा आधार वाटतो.

- अरूण साधू

# श्रीमंत राष्ट्रे, गरीब राष्ट्रे

एकविसाव्या शतकाच लागलेली चाहूल, माहिती-प्रसाराच्या क्षेत्रातील क्रांतिकारक बदल, उपग्रह आणि इंटरनेट यांनी जगाला जवळ आणणे, आणि जगाचे रूपांतर एका 'जागतिक खेड्या'त करणे, या सगळ्याच बाबी, ज्ञानाच्या आणि विविध उत्पादनांच्या-विक्रीच्या क्षेत्रांत असणाऱ्यांना विलक्षण आकर्षित करणाऱ्या आहेत, यात काहीच शंका नाही. ज्या कुणाचा या नव्या जागतिक घटनांशी जवळून वा दुरून परिचय होतो, तो आपल्या मनोमन असे समजतो की जग आता साफ बदलले आहे. येत्या काही काळात तर ते आणखीनच वेगाने बदलणार आहे. कदाचित या जाणीवांनी तो मनात धास्तावतो; थोडासा सुखावतोही.

विसाव्या शतकाच्या अखेरीचे जगाचे हे चित्र खरेही आहे आणि बरेही आहे, तरीही ते अपुरेही आहे.

जगाची ही जशी एक उजेडाची बाजू आहे तशीच मागच्या शतकाच्या आठवणी रेंगाळत ठेवणारी एक अंधारी बाजूही आहे. विकसित जग आणि अल्पविकसित (अथवा अधिक आशादायक शब्द 'विकसनशील') जग यांमधील अगदी मूलभूत बाबतींतील अंतरही कमी करण्याची किमया, जगाची, वर वर्णन केलेली, क्रांतिकारक प्रगती, करू शकलेली नाही.

उदाहरणच घ्यायचे झाले तर प्राथमिक स्वरूपाच्या आरोग्य सेवांचे घेता येईल. आजही जगात घडून येणाऱ्या (पाच वर्षांच्या आतील) बालमृत्यूंपैकी ९८ टक्के मृत्यू हे अल्पविकसित राष्ट्रांतून घडून येतात. एडस् हा तसा नव्याने पुढे आलेला आजार. परंतु ज्यांना या रोगाची लागण झाली आहे (एच् आय व्ही पॉझिटिव्ह) अशांपैकी ९५ टक्के रोगी गरीब राष्ट्रांमधले आहेत. मलेरिया, क्षयरोग, देवी, धनुर्वात वगैरे वगैरे अशा रोगांनी पछाडलेले बहुतेक सर्वजण याच गरीब राष्ट्रांचे रहिवासी आहेत. पाश्चिमात्य (विकसित) देशांमधील आजचा महाभयंकर आजार म्हणजे लंगकॅन्सर. परंतु दरवर्षी हा आजार, तेथे, जितक्या लोकांचा बळी घेतो, त्याच्यापेक्षा कितीतरी अधिकपटीने गरीब राष्ट्रांमधील क्षयरोग दरवर्षी लोकांचे बळी घेत आहे.

यासंदर्भातील श्रीमंत आणि गरीब राष्ट्रांमधील अंतर दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यातही अतिश्रीमंत आणि अतिगरीब राष्ट्रांमधील अंतराबद्दल तर बोलायलाच नको.

हे अंतर कसे कमी करायचे, हे एक आव्हानच आहे. गरीब राष्ट्रांसमोर आणि त्याहीपेक्षा जास्त श्रीमंत राष्ट्रांसमोर.

■

अर्थतज्ज्ञ श्री. जेफरी सॅक्स हे हार्वर्ड विद्यापीठात, आंतरराष्ट्रीय व्यापार या विषयाचे प्राध्यापक आहेत. त्यांनी अशी सूचना केली आहे की इथून पुढे श्रीमंत राष्ट्रांनी, आंतरराष्ट्रीय पातळीवर, विज्ञान नि तंत्रज्ञान यांना, गरीब देशांना गरीब ठेवणाऱ्या विशिष्ट प्रश्नांच्या सोडवणुकीकडे वळविले पाहिजे. आज हे घडत नाही. उदाहरणार्थ, आज गरीब राष्ट्रांपुढचा एक प्रश्न असा आहे की, त्यांना दिवसेंदिवस महाग होत जाणारी औषधे परवडत नाहीत. गरीब राष्ट्रांच्या गरिबीचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे अनारोग्याची परिस्थिती हे असते हे, १९९३ सालच्या जागतिक बँकेच्या 'आरोग्य अहवाला'त दाखवून दिलेच आहे. अशावेळी स्वस्त व पुरेशी औषधे ही अशा देशांची दैनंदिन गरज आहे. परंतु बहुराष्ट्रीय औषध कंपन्या मात्र, औषध संशोधनावर कोट्यवधी रुपये खर्च करताना, गरिबांच्या नव्हे तर श्रीमंतांच्या आजारावर लक्ष केंद्रित करतात. कारण स्पष्टच आहे. त्यांना त्यांच्या संशोधनाला म्हणजे संशोधित औषधांना विक्रीतून चांगली किंमत मिळाली पाहिजे. चांगला नफा मिळाला पाहिजे. जेफरी सॅक्स यांची सूचना यासंदर्भात महत्त्वाची आहे. ते दाखवून देतात की, विविध रोगांच्या लसनिर्मितीवर संशोधन करणाऱ्या कंपन्या, आपले सारे लक्ष अमेरिका-युरोपमधील जंतूमुळे उद्भवणाऱ्या रोगांवर केंद्रित करताहेत. त्यांनी जर मलेरिया, धनुर्वात, एडस् अशा रोगांवर लस तयार केली तर त्याचा लाभ फारच मोठ्या प्रमाणावर गरीब राष्ट्रांना होणार आहे. पण अशा संशोधनावरील गुंतवणुकीचा फायदा मात्र आपल्याला मोठ्या प्रमाणावर मिळेल असे या कंपन्यांना वाटत नाही; आणि म्हणून त्या तसे करीत नाहीत.

**मग हा पेच सुटणार कसा ?**

जेफरी सॅक्स यांच्या यासाठी दोन सूचना आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की या कंपन्यांना, समजा मलेरियावरील लस तयार करायला प्रवृत्त करायचे असेल, तर त्यांना त्यांच्या संशोधित लसीला खात्रीलायक बाजार उपलब्ध करून दिला पाहिजे. त्यासाठी, श्रीमंत देशांनी पुढे येऊन, एका विशिष्ट किंमतीला ही लस खरेदी करण्याची तयारी दर्शविली पाहिजे आणि मग ती (उदाहरणार्थ) अफ्रिकेत दरवर्षी जन्माला येणाऱ्या अडीच कोटी बालकांना टोचण्याची व्यवस्था स्वखर्चाने केली पाहिजे. अर्थात यातला काही खर्च

उचलायला हे लाभार्थी देशही तयार होतीलच. असे केल्याने अनेक कंपन्या या क्षेत्रात संशोधनासाठी सज्ज होतील आणि लवकरच या संशोधनांना फल येऊन अशा लसी तयारही होतील. त्याने गरीब राष्ट्रांचा आरोग्याचा एक फार मोठा प्रश्न आवाक्यात येऊ शकेल. जेफरी सॅक्स यांची दुसरी सूचना अशी आहे की, 'जागतिक आरोग्य संघटना' किंवा 'अन्न व शेतकी संघटना' या यूनोप्रणित संस्थांनी आरोग्य व शेती या क्षेत्रांतील प्राधान्ये ठरवून दिली पाहिजेत, आणि त्या क्षेत्रांतील संशोधनासाठी खाजगी कंपन्यांशी हातमिळवणी केली पाहिजे. अशा भागिदारीला इथून पुढच्या काळात पर्याय नाही. कारण, एरवी बहुराष्ट्रीय औषध कंपन्यांकडून संशोधन व विकासकार्यावर होणारा अक्षरशः कोट्यवधी रुपयांचा खर्च फक्त श्रीमंत राष्ट्रांच्या आरोग्य विकासासाठी उपयुक्त ठरेल. आणि पुन्हा श्रीमंत-गरीब राष्ट्रांमधील अंतर वाढतच जाईल.

■

श्रीमंत राष्ट्रे आणि गरीब राष्ट्रे यांच्या नैसर्गिक परिस्थितीतच मूलभूत असा फरक आहे. गरीब राष्ट्रे ही केवळ आर्थिकदृष्ट्याच गरीब आहेत असे नाही. (तसे असते तर दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांतील अंतर कमी करण्याचा प्रश्न हा केवळ आर्थिक- त्यातही उत्पन्न विभागणीशी संबंधित असा- झाला असता. तो तुलनेने सोपाही असता.) गरीब राष्ट्रे ही प्रामुख्याने अगदी भिन्न अशा नैसर्गिक परिस्थितीतील आहेत. त्यांची आरोग्यविषयक परिस्थिती मूलतः किंवा गुणात्मकदृष्ट्या वेगळी आहे. या देशांमधील शेतीविषयक परिस्थिती व मर्यादा याही श्रीमंत राष्ट्रांतील स्थितीपेक्षा भिन्न आहेत. आणि त्यांच्या गरिबीची कारणे, कुठेतरी, या भिन्नतांशी संबंधित आहेत.

हवामानाच्या दृष्टीने पाहता, लक्षात येईल की उच्च उत्पन्न गटाची तीस राष्ट्रे ही प्रामुख्याने समशीतोष्ण हवामानाच्या प्रदेशात आहेत. या गटातील सुमारे ९३ टक्के लोकसंख्या समशीतोष्ण किंवा शीत हवामानाच्या प्रदेशात राहते आहे. याच्या उलट, जगातील ४२ कर्जबाजारी गरीब देशांपैकी ३९ देश उष्ण हवामानाच्या वा वाळवंटी प्रदेशातील आहेत. या भिन्न अशा हवामानांचा तेथील लोकांच्या जीवन-मरणाशी संबंध आहे. समशीतोष्ण हवामानातील लोकांचे सरासरी आयुष्यमान मोठे आहे (७० वर्षे). तर तुलनेने ते उष्णकटिबंधातील लोकांच्या बाबतीत कमी आहे (५१ वर्षे). ही गोष्ट आजारांशी संबंधित आहे. मलेरिया, गोवर-कांजिण्या, निद्रानाश आणि असे कित्येक आजार उष्ण हवामानात फोफावतात; त्यामुळे त्यांचा प्रादुर्भाव उष्णकटिबंधातील गरीब देशांमध्ये दिसून येतो. हे आजार थंड हवामानाच्या प्रदेशात फारसे तग धरू

शकत नाहीत. तेथे असणारे आजार हे अर्थातच वेगळे असतात. तेथील हृद्रोग किंवा कॅन्सर यांवर चाललेल्या संशोधनांतून गरीब राष्ट्रांमधील मलेरियासारख्या सार्वत्रिक आजारांवरील उपाययोजना निघू शकणार नाही. वास्तविक नैसर्गिक परिस्थितीने निर्माण केलेली ही भिन्नता, 'गरीब राष्ट्रांना कायमची गरीब कशी ठेवणार नाही' यावरच इथून पुढे जागतिक स्तरांवरील धोरणांचा भर असावा लागेल. एरवी श्रीमंत व गरीब राष्ट्रांमधील अंतर भरून निघणार नाही.

■

आंतरराष्ट्रीय पातळीवरील उत्पन्नांमधील विषमता, ही विज्ञान व तंत्रज्ञानांतील विषम प्रगतीमुळे दिवसेंदिवस अधिक तीव्र होत चालली आहे. वेगवेगळी शास्त्रीय विषयांवरील प्रकाशने काय किंवा विविध स्वामित्वहक्कांची (पेटंटसची) संख्या काय, या सर्वांमध्ये युरोप, अमेरिकेचाच वरचष्मा आहे. याबाबतीत आणखी एक घटना लक्षात घेण्यासारखी आहे. जागतिक पातळीवरील विज्ञान-तंत्रज्ञानाची दिशा ही राष्ट्रे ठरवतच आहेत आणि तीही याच देशांच्या बाजारपेठांच्या गरजांसाठी आहे. पण त्यासाठी आवश्यक ती शास्त्रीयक्षेत्रातील बुद्धिमत्ताही गरीब राष्ट्रांकडून गोळा केली जात आहे. उदाहरणार्थ, बरेचसे तंत्रविज्ञान क्षेत्रांतील लहान-मोठे शोध, श्रीमंत राष्ट्रांच्या प्रयोगशाळांतून काम करणाऱ्या गरीब देशांच्या संशोधकांनीच लावलेले आहेत. भारतीय किंवा चिनी शास्त्रज्ञांचेच प्राबल्य अमेरिकेच्या 'सिलिकॉन व्हॅली'मध्ये आहे हे अनेकांना माहीतच आहे.

शास्त्रीय जगतातील विषमतेला अनेक घटक जबाबदार आहेत. जेफरी सॅक्स यांच्या मते, जागतिक स्तरावरील तीन घटना विचारात घेण्यासारख्या आहेत. एक म्हणजे, शास्त्रीय जगतातील परिस्थिती बाजारपेठेच्या नियमांनुसार वळण घेते. विशेषतः आजच्या काळात संशोधनासाठी अत्यंत परिपूर्ण अशा प्रयोगशाळा नि खर्चिक शास्त्रीय उपकरणांची गरज असते. त्यामुळे त्यांचे अर्थशास्त्र विचारात घ्यावे लागते. दुसरे म्हणजे, शास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्रात 'वाढत्या उत्पादनफलाचा सिद्धान्त' कार्यरत असतो. म्हणजे जसजशी शास्त्रज्ञांची संख्या वाढते तसतशी त्यांची सीमान्त उत्पादकता घटत नाही तर ती वाढत जाते. त्यामुळेच मोठमोठ्या कंपन्या किंवा विद्यापीठे या क्षेत्रात हिरिरीने उतरत आहेत. तिसरी गोष्ट अशी की, मुक्त बाजाराचे तत्त्वज्ञान कितीही घोकले तरी, शास्त्रांच्या क्षेत्रात खाजगी व सरकारी अशा दोन्ही क्षेत्रांना हातात हात घालून काम करावे लागते. अशाच पद्धतीने आजपर्यंत तंत्रविज्ञानांनातील भरीव पावले टाकली गेली आहेत.

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील संगणकासारखी तंत्रे जगाच्या पाठीवर कुठेही एकाच पद्धतीने वापरता येतात. परंतु जीव-शास्त्रांच्या क्षेत्रात काय किंवा ऊर्जेचा वापर, इमारत बांधणी अशातऱ्हेच्या अनेक क्षेत्रांतील तंत्रे ही विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीशी संबंधित अशी असतात. परिणामतः ती एकीकडून दुसरीकडे जशीच्या तशी वापरता येत नाहीत किंवा मुळात उपयोगीच पडत नाहीत. आणि अशावेळी जर का जागतिक संशोधनाचा सर्व भर श्रीमंत राष्ट्रांच्या गरजांशी नि तेथील बाजारपेठांशी संबंधित असेल तर त्यामुळे श्रीमंत व गरीब राष्ट्रांमधील दरी कमी न होता उलट वेगाने वाढतच जाईल.

■

आता वर्षाभरात नवे सहस्त्रक सुरू होईल. अशावेळी श्रीमंत नि गरीब राष्ट्रांच्या संबंधांत नव्या विचारांचे पर्व सुरू होण्याची गरज आहे. पुढील शतकातील सर्व मानवांचे जीवनमान बऱ्यापैकी सुधारावे या हेतूने हे व्हावे लागेल. यासाठी पावले कशी टाकली जावीत याचे मार्गदर्शन जेफरी सॅक्स यांनी, केले आहे.

याच वर्षी नुकतीच 'जी-आठ' या श्रीमंत राष्ट्रांची एक बैठक झाली. सॅक्स म्हणतात, अशातऱ्हेची ही शेवटची बैठक ठरावी. इथून पुढे श्रीमंत व गरीब राष्ट्रांनी एकत्र बसूनच विचारविनिमय करायला हवा.

या तऱ्हेच्या एकत्रित विचारविनिमयात कळीचा मुद्दा असावा तो गरीब राष्ट्रांतील प्रश्नांच्या सोडवणुकीकडे जगातील विज्ञान-तंत्रज्ञानाचा रोख वळण्याचा. आजतरी, जागतिक बँक किंवा आंतरराष्ट्रीय चलननिधी या संस्था या दिशेने काम करण्यास अपुऱ्या आहेत. यूनोच्या संस्थांनी यात उतरले पाहिजे. शिवाय नवीन कालासाठी नवीन संघटनाही अस्तित्वात यायला हव्यात. पुढील सहस्त्रकासाठी एखादा 'लसीकरण निधी' उभा करून त्याकरवी मलेरिया, क्षयरोग, एड्स् यांच्यासंबंधी लस-संशोधन पुढे न्यावे लागेल. अशातऱ्हेच्या नवीन संघटनांची सुरुवातही या 'निधी' पासून करता येईल.

'बौद्धिक संपत्ती हक्कां'बाबतही नवा दृष्टिकोण अंगिकारावा लागेल. आज या हक्कापोटी गरीब राष्ट्रांच्या निसर्गाची जी पिळवणूक बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून चालली आहे तिला आळा घालावा लागेल. किंबहुना बौद्धिक संपत्तीचा हक्क आणि गरीब राष्ट्रांच्या गरजा यांचा कुठेतरी मेळ घालावा लागेल. तसेच नवे ज्ञान, नवे तंत्रज्ञान यांच्या वापराबाबत नवी नियमावली अंमलात आणावी लागेल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, गरीब राष्ट्रांनी संपन्नतेकडे वाटचाल करावी यासाठी, त्यांना लागणाऱ्या आंतरराष्ट्रीय सामाजिक वस्तू निर्माण व्हाव्यात यासाठी वित्तपुरवठा दीर्घकाल कसा करावा यावर गंभीरपणे चर्चा सुरू झाली पाहिजे.

■■

---

**संदर्भ :** दि. १४ ऑगस्ट १९९९ च्या इकॉनॉमिस्ट या नियतकालिकातील (१) 'सॅक्स ऑन डिव्हलपमेंट' व (२) 'हेल्पिंग द पुअरेस्ट' हे दोन लेख व १९९३ चा जागतिक बँकेचा आरोग्य अहवाल.

**सजगता**

*आज एकविसाव्या शतकाकडे जाण्याचा उल्लेख वारंवार व विविध संदर्भात होत असतो. वस्तुतः काहीही न करता केवळ तोपर्यंत जगणारे म्हणजे जिवंत राहणारे आजचे सर्वजण त्या शतकात जाणार आहेत. तेव्हा उल्लेख करण्यामागे एकप्रकारची सजगता अपेक्षित असते. ती जर यावयाची असेल तर एकंदर मानवी ज्ञानसाधनेचा व्यापक अनुबंध आणि उत्क्रमण माहीत असणे हे महत्त्वाचे पाथेय ठरेल. ........ सजगता म्हणजे नेमके काय, असा मी विचार करतो तेव्हा तीन जाणिवा मजपुढे येतात. पहिली ज्ञानमनस्कता, दुसरी समाजमनस्कता आणि तिसरी कालभानमनस्कता.*

*डॉ. दु. का. संत*

# महाराष्ट्राची भूजल परिस्थिती

महाराष्ट्राला दर चार-पाच वर्षांच्या अंतराने दुष्काळसदृश परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. काही तालुक्यांत तर कायमचीच पाणी टंचाई असते. अशा तालुक्यांत एखाद्या वर्षी कमी पर्जन्यमान झाले तर त्यानंतर येणाऱ्या उन्हाळ्यात शासनाला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न युद्धपातळीवर हाताळावा लागतो. पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी एकमेव उपाय म्हणून, आजपर्यंत महाराष्ट्रात शासनातर्फे लक्षावधी विहिरी व विंधन विहिरी घेतल्या आहेत. त्यांव्यतिरिक्त खाजगी स्तरावर किती विहिरी व विंधन विहिरी घेतल्या आहेत याची नोंदच नाही.

मोठ्या प्रमाणावर विहिरी व विंधन विहिरी घेताना महाराष्ट्रातील खडकांत मोठ्या प्रमाणावर भूजल उपलब्ध आहे, असे गृहित धरले जाते. त्यामुळे ते पाणी विहिरी व विंधन विहिरींवाटे उपलब्ध करून दिले की पाण्याचा प्रश्न आपोआप सुटेल असा समज सर्वसाधारणपणे झालेला आहे. महाराष्ट्रात खरोखरीच मोठ्या प्रमाणावर भूजल उपलब्ध असेल तर इतक्या मोठ्या संख्येने विहीरी व विंधन विहीरी घेतल्यानंतर आजपर्यंत वास्तविक हा प्रश्न सुटावयास हवा होता, पण १९७२ च्या दुष्काळानंतर, विहिरी व विंधन विहिरी घेण्याचा धडक कार्यक्रम सुरू केल्यानंतर, आजपर्यंतचा आपला अनुभव असा आहे की, भूजलाची पातळी सतत खाली खाली जात आहे. ज्या विहिरींना पूर्वी मार्च अखेरपर्यंत बऱ्यापैकी पाणी असे त्याच विहिरी आता जानेवारी-फेब्रुवारीतच आटू लागतात. आवर्षणप्रवण भागाची व्याप्तीही वाढत चालली आहे. पाण्याची टंचाई असलेल्या गांवांच्या संख्येत दरवर्षी कशी वाढ होत आहे याचे प्रतिबिंब महाराष्ट्र शासनाने पिण्याचे पाणी पुरवठा कार्यक्रमासंबंधी जी श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली आहे त्यात ठिकठिकाणी दिसून येते. श्वेतपत्रिकेतील पान नं.२ (५) मध्ये म्हटले आहे की, "ग्रामीण भागात सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस १७११२ समस्याप्रधान गावांपैकी योजनेच्या काळात १५८८३ गावांत कार्यक्रम राबवूनसुद्धा सातव्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस २३३०६ गावे समस्याप्रधान होती. यापैकी १९९१-९२ पर्यंत २१७१७ गावे हाताळून १९९२-९३ च्या सर्वेक्षणात १६७९० गावे व १८४२६ वाड्या समस्याग्रस्त आढळल्या. या सर्व कार्यक्रमावर सहाव्या योजनेपासून आजपर्यंत २००० कोटींचा खर्च करूनसुद्धा समस्येची तीव्रता कायम आहे." महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत तर टँकरने पाणी पुरविणे हा आता नित्याचा कार्यक्रम झाला आहे.

महाराष्ट्रात आज भूजलासंबंधी इतकी ओढग्रस्त स्थिती का आहे हे समजावून घ्यावयाचे असेल तर, तसेच त्यावर काय उपाययोजना करता येईल हे ठरविण्यासाठी खडकात भूजल कसे तयार होते हे समजावून घेणे आवश्यक आहे.

खडकात असलेल्या रंध्रांत व भेगांत पावसाचे पाणी मुरून साठून राहाते व तेच पाणी आपणास भूजल म्हणून उपलब्ध होते. सर्वसाधारणपणे ज्या खडकात रंध्रे असतात अशा खडकांतून भूजल मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होते, असा भूशास्त्रज्ञांचा अनुभव आहे. महाराष्ट्रातील खडकात रंध्रे व भेगा यांपैकी कोणत्या मार्गाने भूजल तयार होते हे पाहाणे यासाठीच जरुरीचे आहे.

महाराष्ट्राचा जवळ जवळ ८५ टक्के भूभाग हा लाव्हारस थंड होऊन, थिजून तयार झालेल्या क्षितीजासमांतर असलेल्या अगणित लाव्हांच्या थरांनी तयार झालेला आहे. महाराष्ट्रात मुख्यत्वे दोन प्रकारचे लाव्हांचे थर आहेत. त्यांपैकी एक म्हणजे कॉम्पॅक्ट बसाल्ट व दुसरा म्हणजे अँमिग्डलॉयडल बसाल्ट. या दोन खडकांचे क्षेत्रीय गुणधर्म अत्यंत भिन्न आहेत. बसाल्ट खडकांची भूजलधारण क्षमता त्या खडकांच्या क्षेत्रीय गुणधर्मांवर अवलंबून असते. बसाल्ट खडक हे लाव्हारस थंड होऊन थिजून तयार झाले असल्याने ते खडक जेव्हा ठणठणीत स्वरूपात असतात तेव्हा त्यांत रंध्रे नसतातच. महाराष्ट्रातील खडकात रंध्रातील पाणी उपलब्ध नसल्याने भूजलाच्या उपलब्धतेवर मर्यादा पडतात. बसाल्ट खडकात फक्त आकुंचन संधींच्या भेगातच पाणी मुरण्याची शक्यता असते. कॉम्पॅक्ट बसाल्ट व अँमिग्डलॉयडल बसाल्ट या दोन प्रकारच्या खडकापैकी फक्त कॉम्पॅक्ट बसाल्ट थराच्या मध्य भागात व खालच्या भागात आकुंचन संधीच्या भेगा असतात. अँमिग्डलायडल बसाल्टमध्ये आकुंचन संधींच्या भेगा अपवादात्मकच असतात.

कॉम्पॅक्ट बसाल्ट खडकातील आकुंचन संधींच्या भेगा पृष्ठभागावर उघड्या पडलेल्या असतील तर त्यावाटे पावसाचे पाणी पृष्ठभागाखाली मुरू शकते. पण संधींच्या भेगा नसलेला, ठणठणीत स्वरुपातील, अँमिग्डलायडल खडक पृष्ठभागावर उघडा पडलेला असेल तर त्यावाटे पावसाचे पाणी मुरू शकत नाही. महाराष्ट्राच्या ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, नगर, धुळे जळगांव, औरंगाबाद, जालना या जिल्ह्यांत तसेच परभणी जिल्ह्यातील पाथ्री व सेलू हे तालुके, बीड जिल्ह्यातील अष्टी व पाटोदा हे तालुके आणि बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा व चिखली तालुके या भागात मुख्यत्वे अँमिग्डलॉयडल बसाल्ट खडकांच्या थरांचेच प्राबल्य आहे. त्यामुळे या भागांत पावसाचे पाणी मोठ्या

प्रमाणावर मुरू शकत नाही आणि या भागातच पिण्याच्या पाण्याचे नेहमी दुर्भिक्ष असते.

खडकांच्या क्षेत्रीय गुणधर्मांमुळे पाणी मुरण्यास कशा मर्यादा पडतात याचे उत्तम उदाहरण म्हणून ठाणे व रायगड या जिल्ह्यांचे देता येईल. या दोनही जिल्ह्यांत सरासरीने २५०० मि.मि. एवढा दरवर्षी पाऊस पडतो. तरीही उन्हाळ्यात या जिल्ह्यातील खेडेगावांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावतो. याचे कारण या दोनही जिल्ह्यांत ॲमिग्डलायडल बेसाल्ट खडकांचे प्राबल्य आहे.

कॉम्पॅक्ट बसाल्ट खडकांमध्ये असलेल्या संधींच्या भेगावाटे पावसाचे पाणी मुरू शकत असले तरी, पाणी किती प्रमाणात मुरेल हे सर्वस्वी त्या थराचा कोणता भाग जमिनीवर उघडा पडलेला आहे, तसेच संधीच्या भेगांची संख्या किती आहे, व त्यांची संरचना कशी आहे, यावर अवलंबून असते.

कॉम्पॅक्ट बसाल्ट खडकात संधींच्या भेगा मोठ्या संख्येने असतील व त्या एकमेकींना छेदून जात असतील तर अशा खडकात चांगल्या प्रमाणात पावसाचे पाणी मुरू शकते. पण संधींच्या भेगा बऱ्याच दूर दूर अंतरावर असतील तर अशा खडकात पावसाचे पाणी कमी प्रमाणात मुरते. काही कॉम्पॅक्ट बसाल्ट थरातील संधींच्या रचनेत सुसूत्रता नसेल, तसेच संधींच्या भेगा एकमेकींना छेदून जात असतील तर अशा खडकात संधींच्या भेगा असूनही त्यात पाणी मुरू शकत नाही.

कॉम्पॅक्ट बसाल्ट खडकांच्या संधींच्या भेगांच्या संख्येत तसेच संरचनेत सर्वदूर सारखेपणा नसतो त्यामुळे एकाच भागातील एका विहिरीला चांगले पाणी असते तर त्या विहिरीपासून काही अंतरावर असलेल्या विहिरीला फारच कमी पाणी असते.

संधीच्या भेगा पृष्ठभागालगत उकललेल्या अवस्थेत असतात. पण त्याच भेगा काही खोलीनंतर पूर्णतः मिटलेल्या असतात. त्यामुळे पावसाचे पाणी संधींच्या भेगावाटे पृष्ठभागाखाली मुरले तरी ते काही खोलीपर्यंतच मुरते. त्यामुळे महाराष्ट्रातील विहीरींना उथळ खोलीपर्यंतच पाणी लागते, व त्या खालील खडक कोरडा असतो.

अशा प्रकारे महाराष्ट्रातील बसाल्ट थरांच्या क्षेत्रीय गुणधर्मांमुळे भूजल निर्माण होण्यास बऱ्याच मर्यादा असल्या तरी तोच खडक थोडासा कुजल्यावर, त्यात द्वितीयक रंध्रे तयार होऊन आडव्या संधींच्या भेगा तयार होतात, व अशा कुजलेल्या खडकातून बऱ्यापैकी भूजल मिळू शकते. ॲमिग्डलॉयडल बसाल्ट

असलेल्या प्रदेशात विहीरींना पाणी लागते ते अशाच कुजलेल्या खडकात. अर्थात कुजलेल्या खडकात किती पाणी लागेल ते कुजलेल्या खडकाची जाडी किती आहे यावर अवलंबून असते.

भूजलाची समस्या सोडविण्यासाठी मुख्यत्वे खालील दोन गोष्टी केल्या पाहिजेत.

१) महाराष्ट्रातील खडकात दरवर्षी कमी प्रमाणात पाणी मुरते व मर्यादित भूजल निर्माण होते ही वस्तुस्थिती खेडेगावातील लोकांच्या मनावर विशेषतः शेतकऱ्यांच्या मनावर बिंबविणे जरूर आहे. त्यासाठी बालवयापासून त्यांचे प्रबोधन करणे जरुरीचे आहे. तसेच उपलब्ध असलेले भूजल काटकसरीने कसे वापरता येईल याबद्दल त्यांचे प्रबोधन केले पाहिजे.

२) पृष्ठभागाखाली पाणी मुरावे म्हणून मोठ्या प्रमाणावर पाझर तलाव बांधले जातात. बसाल्ट खडकांच्या क्षेत्रीय गुणधर्मांच्या वैविध्यामुळे कोठेही पाझर तलाव बांधला तर पाणी मुरेलच अशी शक्यता नाही. म्हणून पाझर तलाव बांधण्याआधी त्या भागाचे भूशास्त्रीय सर्वेक्षण करून ज्या ठिकाणी पाणी मुरण्यास अनुकूल भूशास्त्रीय परिस्थिती आहे अशा ठिकाणी पाझर तलाव बांधले पाहिजेत. ज्या तलावांतून पाणी पाझरते, त्यांतील पाण्याचा पाझर हळूहळू कमी होतो व शेवटी पाणी पाझरण्याचे थांबते असा अनुभव आहे. त्यामुळे पाझर तलाव बांधतानाच अशी संरचना केली पाहिजे की, पाझर तलावातील पाणी बाहेर काढून वापरता येईल. पाझर तलावातील पाणी पाझरत नसले तरी पृष्ठभागावर पाण्याचे साठे तयार करणे आवश्यक आहे. त्यासाठी जेथे शक्य आहे तेथे गावतळी, तलाव, बंधारे या सारख्या गोष्टी करणे आवश्यक आहे.

**डॉ. बी. एम्. करमरकर**

■■

---

**टीप :** भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने दि. १९ सप्टेंबर १९९९ रोजी 'महाराष्ट्रामधील बसाल्ट खडकांतील भूजलाची स्थिती' या विषयावर चर्चागटाची सभा आयोजित केली होती. त्यावेळी डॉ. बी. एम. करमरकर यांनी हा विषय मांडला. त्यांनी दिलेली ही टिपणी आहे.

# अबला सबला झाल्या

स्त्रियांचे हक्क, अधिकार, आर्थिक स्वातंत्र्य हे शब्द वापरून बुळबुळीत झाले असतानाच, गुजरातमधील साकरियापुरा खेड्यातील स्त्रियांनी वरीलपैकी एक शब्दही न उच्चारता आपल्या कृतीतून एक चांगले उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. बहोद्यापासून (म्हणजे खरेतर वडोदऱ्यापासून) तेवीस किलोमीटर्स अंतरावरील नांदेसरी येथे काही रासायनिक कारखाने व वसाहती आहेत. येथूनच थोड्या अंतरावर साकरियापुरा हे खेडे आहे. भारतातील अनेक खेड्यांचे प्रतिनिधित्व करू शकेल असेच हे एक खेडे. कौलारु घरे, त्यात डोक्यावर पदर घेतलेल्या बायका, त्यांच्या आजूबाजूला लहान-मोठी उनाडक्या करणारी मुले व गुरे, शेती किंवा मोलमजुरी करून उपजीविका करणारे पुरुष असे साधारणपणे सर्वच खेड्यात आढळणारे चित्र. साकरियापुराही याला अपवाद नव्हते. गेल्या दोन वर्षांपासून मात्र यात एक बदल झाला आहे. घराच्या चार भिंतीत राहणाऱ्या येथील स्त्रिया पहाटेपासून अर्थार्जनासाठी घराबाहेर पडू लागल्या. त्यांचे कार्यक्षेत्र म्हणजे त्यांचेच खेडे. आता या स्त्रिया अर्थार्जन म्हणजे नेमके काय करतात ? तर चक्क दुधाची डेअरी चालवतात.

त्याचे असे झाले की येथे घरोघरी गाई-म्हशी भरपूर. दुग्ध व्यवसाय हा येथील एक मोठा व्यवसाय. पण खेड्यापाड्यांतून शहरात रोज दुधाची ने-आण करणे अवघड. त्यामुळे गावातल्या पुरुषांनी गावातच एक डेअरी सुरू केली. सर्वांच्या घरचे दूध तिथे एकत्र करून पुढील व्यवहार डेअरीतर्फे होत असत. पण हा व्यवसाय तोट्यातच राहिला. शिवाय दुधात भेसळ असल्याच्या तक्रारी वारंवार येत असत. सुमारे आठ वर्षे असाच नुकसानीत हा कारभार रडत-खडत चालू होता. गावातील पुरुष कंटाळले होते. तेव्हा 'दीपक चॅरिटेबल ट्रस्ट' या स्वेच्छासेवी संस्थेने या प्रकरणी लक्ष घालण्याचे ठरवले.

या संस्थेने गावातील महिलांच्या हातात डेअरीचा सर्व कारभार सोपवावा, असे ग्रामस्थांना सांगितले. अपेक्षेप्रमाणे, हे कसे शक्य होईल? स्त्रियांना घरकामांतून वेळ काढता येईल का ? त्यांना हिशेब व इतर सर्व व्यवस्थापन जमेल का? अशा अनेक प्रश्नांना संस्थेला सामोरे जावे लागले. खरे तर, या स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करुन त्यांना या कामासाठी उद्युक्त करणे, हे सर्वात अवघड व महत्त्वाचे काम होते. पण सतत समजावून त्यांचे प्रश्न, अडीअडचणी समजून घेत, त्यांना त्यावर उपाय सांगून या कामी हळूहळू प्रगती होत गेली. अखेरीस या खेड्यातील महिला डेअरी चालविण्यास तयार झाल्या.

आता या स्त्रियांचा दिवस पहाटेपासून सुरू होतो. घरच्या गाई-म्हशींचे दूध काढून ते एका ठिकाणी गोळा करणे, वडोदरा येथून दूध गोळा करणाऱ्या गाड्या येऊन दूध घेऊन जाईपर्यंत या स्त्रिया दुधाच्या कामात अडकलेल्या असतात. यानंतर हिशोब व इतर कार्यालयीन कामे असतात. सायंकाळी परत एकदा दूध काढून वडोदऱ्याला पाठविणे हा कार्यक्रम असतो.

सुरुवातीला याच महिलांनी एकत्र येऊन डेअरीसाठी प्रत्येकी पन्नास रुपये याप्रमाणे २५०० रुपये गुंतवणूक केली. नंतर खेड्यातील कर्ज देणाऱ्या संस्थेकडून 'दीपक चॅरिटेबल ट्रस्ट'च्या मदतीने त्यांनी कर्ज मिळविले. यानंतर खरे डेअरीचे काम सुरू झाले. आज साकरियापुरा येथील सुमारे ८१ कुटुंबांपैकी ५१ कुटुंबातील स्त्रिया डेअरी समितीच्या सभासद आहेत.

स्त्रियांमधील नैसर्गिक गुण म्हणजे चिकाटी, प्रामाणिकपणा, मेहनत व याचबरोबर गृहव्यवस्थापनात उपयोगी येत असणारी व्यवस्थापकीय कौशल्ये यांचा उपयोग केल्याने डेअरीची भरभराट होऊ लागली. हळूहळू तोटा कमी झाला आणि एप्रिल १९९८ ते मार्च १९९९ या आर्थिक वर्षात डेअरीने ५ लाख ३३ हजार ३४१ रुपये नफा मिळविला. आज येथील स्त्रियांना लाभांश तर मिळतोच आहे; शिवाय आपले घरदार सांभाळून आपण कुटुंबाचा आर्थिक भारही उचलू शकतो ही बाब त्यांचा आत्मविश्वास व समाधान वाढविणारी आहे. शिवाय यामुळे आपली कामातील गुणवत्ताही वाढते असे या स्त्रियांच्या लक्षात आले आहे.

डेअरी समितीच्या अध्यक्षा ललिताबेन हतिसिन्ह म्हणतात, "मला तर रुपये-पैसे नीट मोजता देखील येत नव्हते. पण आता मी डेअरीचा लेखा विभाग, हिशेब इत्यादी व इतर सर्व बाजू सांभाळू शकते." "आम्हाला आता बारीक सारीक बाबींसाठी नवऱ्यांवर अवलंबून राहावे लागत नाही." हे आणखी एका स्त्रीचे उद्‌गार. तर "आता मुलांचे शिक्षण, पुस्तके, कपडे, रेडिओ, दूरदर्शन अशा काही वस्तू खरेदी करण्यासाठी आम्ही पैसे जमवू शकतो," हा आनंद दुसरीच्या शब्दांतून व्यक्त झाला आहे.

साकरियापुरातील उदाहरण डोळ्यापुढे ठेवून दमाणपुरा, रैका व दोडका या खेड्यांतील स्त्रियांनीही डेअरी व्यवसायात पाय रोवले आहेत. या सर्व स्त्रियांना छोट्या-छोट्या निर्णयप्रक्रियेत, अर्थार्जनात आपण सहभागी होऊ शकतो, ही जाणीव फार महत्त्वाची वाटते. महिलांमध्ये आपापसात स्पर्धा असते. पण हेवेदेवे व मत्सर गळून पडून सहकार्याची नवी भावना वाढीस लागते, असा त्यांचा अनुभव आहे. नांदेसरी जवळच्या काही खेड्यांमध्ये अशा रीतीने पुन्हा

एकदा स्त्रीप्रणित ग्रामीण अर्थव्यवस्था आकारास येत आहे व या स्त्रियांची पाउले आता सबलीकरणाकडे वाटचाल करीत आहे हे महत्त्वाचे आहे.

■■

---

**संदर्भ :** 'डाऊन टू अर्थ' या पाक्षिकाच्या १५ सप्टेंबर १९९९चा अंक.

## *आरोग्याला धोका आता 'बुशमीट'चा*

*औद्योगिक व आर्थिक विकासाच्या गतीमुळे पर्यावरणवाद्यांच्या प्रश्नांत रोजचीच एक नवी भर पडत असते. मध्य आफ्रिकेतील वन्यजीवन व तेथील जंगलतोड हा एक असाच काळजीचा विषय. त्यात भर पडली आहे ती जंगलतोडीबरोबरच येथील प्राण्यांची मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या कत्तलीची. ही कत्तल होत आहे ती त्यांचे मांस खाण्यासाठी. जंगली प्राण्यांच्या मांसाला तेथे 'बुशमीट' (Bushmeat) असे नाव रुढ झाले आहे. या प्रकारात हरिण, गोरिला, चिपांझी, हत्ती, साप अशा अनेक प्रकारच्या प्राण्यांच्या मांसाचा समावेश होतो. यापूर्वी 'बुशमीट हंटिंग' हा मोठा प्रश्न नव्हता. कारण, ते फार थोड्या प्रमाणावर होत असे. लाकूडतोड करणारे व तेथे राहणारे लोक थोडीफार कत्तल करून आपली भूक भागवीत असत. पण आता शहरीकरणामुळे व त्यातून निर्माण झालेल्या जंगलतोडीमुळे लाकडाचा व्यापार करणाऱ्यांची संख्या वाढली. जंगलातील एकूणच वर्दळ व मुक्काम वाढल्याने जंगलातील रहिवाशांचे हे अन्न शहरातील व्यक्तींनी चाखून बघितले आणि हा हा म्हणता ही 'बुशमीट' ची चव शहरात पोचली. आता या बुशमीटचे व्यापारीकरणच झाले. म्हणजे प्राण्यांची संख्या कमी होऊ लागलीच. पण त्याबरोबर आरोग्याचा आणखी एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला. जंगलातील प्राण्यांमधील काही रोगांचा प्रवेश आता मानवी शरीरात झाला आहे ही अतिशय चिंतेची बाब आहे. 'एड्स' या रोगाचे विषाणू 'एप' जातीच्या माकडाकडून मानवापर्यंत पोहचले असण्याची शक्यता आहेच. एबोला नावाचा एक तापाचा प्रकार या इथल्या प्राण्यांमध्ये आढळला आहे. या बुशमीट करवी या तापाचा प्रादुर्भाव मानवी शरीरात झाला आहेच. त्यामुळे 'बुशमीट खाऊ नये' अशा सूचना आफ्रिकेतील जंगलात लिहिण्यात आल्या व तसा कडक कायदा झाला तर आश्चर्य वाटायला नको.*

# स्वदेशी : धोरण ? नव्हे, जीवनशैली !

'अर्थबोध पत्रिके'चा एप्रिलचा 'स्वदेशी व जागतिकीकरण विशेषांक' वाचनात आला. त्यांतील लेखांमुळे ह्या विषयाच्या विविध अंगांवर चांगली माहिती मिळाली आणि विचारांनाही चालना मिळाली. 'किस्त्रीम'च्या १९९८ च्या दिवाळी अंकातील राजीव साने यांचा लेख मी पूर्वीच वाचला होता. त्या पायावर असलेली अन्य टिपणे व लेख ह्यांतून साने यांच्या प्रतिपादनांविषयीही काही साधक-बाधक लिहिले गेले हे योग्यच झाले.

पण इतका सगळा विचार होऊनही मला तो अत्यंत अपुरा वाटला. ह्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे तो निव्वळ अर्थशास्त्रीय पायावर आणि चौकटीत झाला आहे. (श्री. खातूंचा लेख हा काही बाबतीत अपवाद.) सध्या अर्थशास्त्राला भलतेच महत्त्व आले आहे, नि प्रत्येक वैयक्तिक-सामूहिक-राष्ट्रीय कृती ही केवळ अर्थशास्त्राच्या आधारे जोखण्याची मोहिनी जगभरातील सर्व विचारवंतांच्या मनावर आहे. पण गंमत अशी आहे की, अर्थशास्त्र हे देकार्तीय विचारांनुसार 'शास्त्र' बनवण्याच्या नादात आणि प्रयत्नात वास्तवापासून दूर गेले आहे. आपले शास्त्र, गणित वा पदार्थविज्ञानाप्रमाणे एक काटेकोर शास्त्र (हार्ड सायन्स) बनविण्याचा सर्व तज्ज्ञांचा प्रयत्न असतो. ह्या काटेकोर शास्त्रांसारखी वस्तुनिष्ठता आपल्याही शास्त्रात आली पाहिजे, म्हणजे ते त्या पदाला पोहोचेल, देकार्तीय चौकटीत बरोबर बसेल असे त्यांना वाटते. पण पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र ही भौतिकशास्त्रे अशी वस्तुनिष्ठ होऊ शकतात; वर्तनवादी वा सामाजिक शास्त्रे तशी होऊ/राहू शकत नाहीत हे त्यांनी लक्षात घेतलेले नाही. अर्थशास्त्र हे ह्या प्रकारात मोडणारे आहे. त्यामुळे ते 'हार्ड सायन्स' बनूच शकणार नाही. पण अर्थतज्ज्ञांच्या मनावरचे देकार्तीय मांडणीचे गारूड (वस्तुनिष्ठता, काटेकोरपणा, गणितीपणा) इतके प्रभावी आहे की, अर्थशास्त्र हे देकार्तीय विज्ञान बनवणे हे त्यांना त्यांचे जणू ईश्वरनियोजित कार्य वाटते. 'जे दिसत नाही वा मोजता येत नाही ते मी मानणार नाही'. असे देकार्तेचे एक प्रसिद्ध वचन आहे. अर्थशास्त्र जेव्हा असे म्हणते, तेव्हा ते केवळ तोकडेच नव्हे, तर अवास्तव आणि हास्यास्पद बनते. 'दरडोई एकूण राष्ट्रीय उत्पन्न' ही विकास मोजण्याची एकमेव मोजपट्टी आज जगभर वापरली जाते. अन् त्यामुळेच अमेरिकेतील राल्फ नेडर हा ग्राहक नेता 'Everytime there is an automobile accident, the GNP shoots up' अशा सणसणीत चपराकीने अर्थशास्त्राची हास्यास्पदता, एकांतीपणा उघड करतो.

'अर्थबोध पत्रिके' मधील स्वदेशी व जागतिकीकरणाचा विचारही असाच अर्थशास्त्र, अर्थव्यवहार ह्या चौकटीत झाला आहे. मला वाटते 'स्वदेशी' ही अर्थशास्त्राच्या झापडबंद पद्धतीने विचार करण्याची गोष्टच नाही. केवळ आर्थिक लाभ-हानीचा विचार करून सर्व क्रियाकलापांचे नियोजन करण्याची सध्या पद्धत आहे. पण अशा क्रियाकलापांमुळे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक वा पर्यावरणीय स्तरांवर किती असंख्य प्रकारांची हानी झाली आहे-होते आहे ह्याकडे सर्वांचेच दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे कागदावर सर्व देशांचा 'विकास' होताना दिसत असताना वास्तवात मात्र मानव आणि पर्यावरण ह्या दोन्हींचा विनाश सामोरा आलेला दिसत आहे !

त्यामुळेच आज अर्थशास्त्राच्या चौकटीबाहेर सर्व गोष्टींचा विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. असा विचार करताना प्रथमच जर कोणती बाब आपल्या ठळकपणे लक्षात येत असेल, तर ती ही की, आपला सध्याचा एकूणच सर्व व्यवहार हा 'उपभोगमूलक' झाला आहे. जागतिकीकरण होते आहे वा ते करायचे, ते उपभोग्य वस्तू सर्वत्र विपुल प्रमाणात मिळाव्यात ह्या उद्देशाने. अशा वस्तूंच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल निसर्गातून काढून घेणे, तो ठिकठिकाणी नेऊन त्यावर विविध प्रक्रिया करणे, आणि अखेरीस जगभर अशा वस्तूंची विक्री करणे हे आपल्या प्रचलित क्रियाकलापांचे थोडक्यात वर्णन आहे. ह्या तिन्ही प्रकाराअंतर्गत विविध गोष्टी करताना मानवाची असंख्य प्रकारांनी -शारीरिक, मानसिक, नैतिक- हानी वा अधःपतन होत आहे. माणसाचा उपभोग येनकेन प्रकारेण वाढावा हा एकमेव हेतू सर्वांच्या मनात आहे. त्याला असा बुभुक्षित बनवण्यासाठी दूरचित्रवाणीसारखी माध्यमे मदतच करीत आहेत. माणसाने स्वतःच्या शारीरिक-मानसिक आरोग्याचा; अर्थार्जनासाठी वापरण्याच्या मार्गांच्या नीती-अनीतीचा; इतरांच्या किमान गरजा तरी भागताहेत की नाही हे बघण्याच्या सामाजिक दायित्वाचा ह्या कशाचाही विचार न करता आंधळेपणाने-बेभानपणाने अधिकअधिक उपभोगाच्या पुरात उडी घ्यावी असे सर्वांना वाटते. मग इतक्या उपभोग्य वस्तू बनवण्याच्या नादात निसर्गातील संसाधने संपत आली, प्रचंड प्रदूषण झाले, जैविक विविधतेचा अकल्पनीय ऱ्हास झाला तरी त्याची फिकीर कोणालाही नाही. पर्यावरण विनाशाच्या कड्यापाशी पोहोचले, तरी संसाधनांचा उपसा वाढतोच आहे, प्रदूषण वाढतेच आहे. आयात वाढो वा निर्यात, मुळात त्या उत्पादनांच्या निर्मितीच्या आणि वितरणाच्या प्रक्रियांत पर्यावरणाची हानी होतेच. ती ह्या ठिकाणची होते की त्या ठिकाणची हा प्रश्न गैरलागू आहे; कारण, पर्यावरणाला सीमा-सरहद्दी नाहीत, कुंपणे नाहीत! कोणत्याही एका ठिकाणची हानी ही 'पर्यावरणाची' हानी आहे.

स्वदेशी किंवा जागतिकीकरण ह्यांचा विचार करताना इतक्या व्यापक पार्श्वपटावर तो होणे आवश्यक आहे. जागतिकीकरण का नको तर, त्यातून वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आणि पर्यावरणीय हानी होते म्हणून. भौतिक, भावनिक, मानसिक, सांस्कृतिक, नैतिक असे ह्या हानींचे अनेक स्तर आहेत. आणि ही हानी केवळ बहुराष्ट्रीय उद्योगांमुळे होते असेही नाही. सध्याची एकूणच व्यवस्था ही दुसऱ्याचे शोषण करण्यावर आधारलेली आहे; त्यामुळे केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावरच नव्हे, तर भारतासारख्या एका विस्तृत राष्ट्राअंतर्गतही (देशी उद्योगांमुळे) ही हानी होतेच. जे प्रदूषण एनरॉन-कोजेंट्रिक्समुळे वाढेल, तेच रिलायन्स वा टाटा केमिकल्समुळेही वाढणारच. जो कच्चा माल (उदा. खनिजे वा वनसंपदा) परके उद्योग वापरणार तोच हे देशी उद्योगही वापरणार. ज्यावर विदेशांत बंदी आहे असे उद्योग (उदा. डायस्टफ) भारतात चालू करणे हा जो वसाहतवाद आहे, तोच वसाहतवाद घातक रासायनिक उद्योग कोकणात काढण्यामागे आहे. त्यामुळे (डॉ. सुबोध वागळे ह्यांनी त्यांच्या लेखात म्हटल्याप्रमाणे) विदेशी उद्योग आणि स्वदेशी उद्योग ह्यांत डावे-उजवे करण्याजोगीही परिस्थिती नाही. म्हणूनच विकसित देश विरुद्ध विकसनशील देश एवढ्याच पातळीवर 'स्वदेशी'चा विचार करून भागणार नाही. तो विस्तारवाद, तो वसाहतवाद, ते शोषण हे त्याखालच्या पातळीवरही चालू आहे. त्यामुळेच 'राष्ट्रीय धोरण' ह्या स्वरूपात 'स्वदेशी'चा विचार करणे हेच मुळात अयोग्य आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात तसा विचार कदाचित योग्य असेलही; पण आज ७०-८० वर्षांनंतर परिस्थिती खूपच बदलली आहे, नि त्यामुळे 'स्वदेशी'चा अधिक सखोल विचार करावा लागेल.

अर्थशास्त्रीय किंवा देकार्तीय चौकटीच्या बाहेर जाऊन असा सखोल विचार करताना आपल्याला एक बाब प्रामुख्याने मान्य करावी लागते की, मूलतः अतिरेकी उपभोगाच्या लालसेतून आपल्यापुढच्या आजच्या बहुतेक सर्व समस्या निर्माण झाल्या आहेत. 'No limits to growth' ही संकल्पना गृहीत धरून आजचे जग पुढे-पुढे चालले आहे. पण ही संकल्पनाच मुळात बरोबर नाही. कारण ज्या नैसर्गिक संसाधनांच्या जीवावर आपण ही वाढ प्रत्यक्षात उतरवणार ती अमर्याद नाहीत. त्यामुळे 'सान्त' संसाधनांच्या आधारे 'अनन्त' भौतिक विकास हे गृहीतकच मुळात चूक आहे. म्हणजेच अनन्त वाढीला एका बाजूने व्यक्तीच्या शारीरिक-मानसिक क्षमतांची मर्यादा आहे, नि दुसऱ्या बाजूला पर्यावरणाची. हे लक्षात घेतले म्हणजे आजची उपभोगवादी जीवनशैली ही शाश्वत नाही हे समजून येईल.

आणि ही उमज पडून आपण जेव्हा चिरस्थायी जीवनशैलीचा विचार करू लागतो तेव्हा एक सुयोग्य अशी जीवनशैली आपल्या लक्षात येऊ लागते. तिलाच आपण 'स्वदेशी जीवनशैली' म्हणू शकू. भौतिक गरजा कमीतकमी ठेवणे आणि स्थानिक वा परिसरातील संसाधनांच्या साहाय्याने त्या स्थानिक पातळीवरच भागवणे अशा प्रकाराची ही रचना असेल. प्रत्येक गाव, वा काही गावांचा समूह आपापल्या गरजा ह्या तऱ्हेने भागवेल. दूरवर नेऊन काहीतरी विकावे वा दूरवरून काहीतरी विकत आणावे ह्या दोन्हींची काही आवश्यकता नाही. (त्या त्या ठिकाणी आवश्यक असणाऱ्या गोष्टी निसर्ग देतोच!) ह्यामुळे एका प्रकाराची आत्मनिर्भरता असेल. समूहाच्या गरजांची पूर्ती सामूहिक निर्णय, सामूहिक प्रयत्न ह्यांतून होईल. सर्वांच्या मूलभूत गरजा भागण्याला आणि सर्वांना चरितार्थासाठी काही ना काही काम मिळण्याला तीत प्राधान्य असेल. नफ्यासाठी अतिरेकी उत्पादन करायचे आणि त्या प्रयत्नात शोषण-प्रदूषण करायचे हा सध्याचा आत्मघातकीपणा ह्या जीवनशैलीत नसेल.

स्वदेशी जीवनशैलीत अन्तर्निहित असलेली ही 'स्थानिकता'च तिला पर्यावरणीयता प्राप्त करून देते. पर्यावरणातील सर्व क्रिया-प्रक्रिया ह्या स्थानिक स्वरूपाच्या असतात. आपण 'जागतिकीकरण' करतो, तेव्हा स्थानिकतेचा संदर्भ सुटतो, आणि त्यामुळेच पर्यावरणाची हानी होते. जी हवा-पाणी-जमीन 'माझी' नसते, तिचा वापर मी खाटकासारखा केला, तर 'माझे' काहीच बिघडणार नसते! पण 'माझी' हवा, 'माझे' पाणी, 'माझी' जमीन ही आपुलकी आली की, त्यांचे शोषण-प्रदूषण मी करणार नाही. माझे जंगल तोडणार नाही. (वनवासी ह्याच भूमिकेतून वनांची जपणूक करतो. उलट कंत्राटदार हा निव्वळ खाटीक असतो.) गरजा आणि साधनसंपत्ती ह्यांचे गुणोत्तर जुळावे ह्यासाठी लोक गरजा मर्यादित ठेवतील कारण, साधनसंपत्तीच्या वाढीला मर्यादा आहे.

अशा स्वदेशी जीवनशैलीत उत्पादन स्थानिक असण्याचे बंधन जसे आहे, तसेच उपभोगही स्थानिक असण्याचे बंधन आहे. साहजिकच, स्थानिक संसाधनांचे शोषण करून काहीतरी उत्पादन करणे, ते बाहेर नेऊन विकणे, नि त्या पैशांतून जगभरातील उपभोग्य वस्तू विकत आणणे हा जो प्रकार बोकाळला आहे, त्याला वाव राहणार नाही. गांधीजी म्हणतात, 'जेव्हा उत्पादन आणि उपयोग दोन्हीही स्थानिक असतात, तेव्हा कोणतीही किंमत देऊन बेसुमार उत्पादन वाढवण्याचा मोह नष्ट होतो. तसे झाले म्हणजे आजच्या अर्थव्यवस्थेमुळे निर्माण होणाऱ्या अनंत अडचणींचा आणि समस्यांचा आपोआप शेवट होईल !'

'स्थानिक गरजांच्या पूर्तीसाठी स्थानिक उत्पादन' केले की, असंख्य प्रक्रिया, रसायनांचा वापर, वाहतूक इ. टळेल. ऊर्जेचा वापर कमी होईल. ह्यातून प्रदूषण आणि अन्य अनेक समस्यांचा निरास होईल. अशा जीवनशैलीत कचरा निर्माण करण्यावर आणि तो बेदरकारपणे कोठेही टाकण्यावर आपोआपच बंधने येतील. मुळात अशा जीवनशैलीतील कचरा सेंद्रिय असल्याने आणि तोही विकेंद्रित असल्यामुळे ती 'समस्या' (लायेबिलिटी) नसून, एक 'ठेवा' (अॅसेट) असेल. केवळ कचराच नव्हे, तर अशा जीवनशैलीतील सर्वच काही विकेंद्रित असेल. त्यामुळे तीत स्वयंपूर्णता, स्वायत्तता आहे. उत्पादन कशाचे, किती, कसे हे निर्णय घेण्याची प्रक्रिया खालच्या पातळीवरच पूर्ण होईल. सध्या तंत्रशाही, उद्योगशाही, नोकरशाही, अर्थशाही हे जे धोके जाणवतात ते तीत नाहीत. ती व्यवस्था खऱ्या अर्थाने 'लोकशाही' व्यवस्था आहे. थोडक्यात, 'स्वदेशी' आणि 'पर्यावरणीय' ही एकाच जीवनशैलीची दोन नावे आहेत असे म्हणता येईल. दोन्हींची कार्यपद्धती समान आहे, जीवनमूल्ये समान आहेत. नैसर्गिक कार्यपद्धतीशी अत्यंत जवळ, समान असणारी अशी ही मानवी रचना असेल. त्यामुळेच ती अधिक चिरस्थायी असेल.

सध्याची स्वदेशी ही प्रायः 'राष्ट्रवादी स्वदेशी' आहे. 'कोलगेट' ऐवजी 'प्रॉमिस' चालणारी ती 'स्वदेशी' आहे. खरी स्वदेशी हे दोन्ही नाकारणारी असेल. ती 'दातवणवाली' वा 'राखुंडीवाली' असेल. तिला 'बाटा'ही नको आणि कानपुरातला कारखानाही नको, स्थानिक चांभाराने बनवलेला जोडा तिला हवा. म्हणजेच 'स्वदेशी'मधील 'देश' ह्याचा अर्थ 'राष्ट्र' असा लावून चालणार नाही; तर 'लहानात लहान क्षेत्र' असाच विचार करावा लागेल. उत्पादन, वितरण, उपभोग ह्यांसाठी ते इष्टतम क्षेत्र हीच सीमा. राष्ट्र - राज्य - विभाग - जिल्हा - तालुका - गाव - घर अशी क्रमाने लघुतम होत जाणारी ती संकल्पना आहे. एका बाजूने भौतिक पातळीवर 'स्वदेशी'चा असा संकोच वांछनीय असताना, जाणिवेच्या पातळीवरची 'स्वदेशी' मात्र क्रमाक्रमाने विस्तारत जाऊ शकते : 'स्वदेशी भुवनत्रयम्' पर्यंत पोहोचू शकते. मानवेतर सृष्टीलाही 'स्व'मध्ये सामावून घेणे हा तिचाच तार्किक विस्तार आहे; आणि ती जाणीव विश्वात्मक होण्यात तिची परिपूर्णता आहे. सारांश, भौतिक आणि आध्यात्मिक अशा दोन्ही पातळीवरचा विश्वकल्याणाचा विचार संभव करणारी अशी ही 'स्वदेशी जीवनशैली' आहे.

मला वाटते सर्वच विचारवंतांनी विशेषतः अर्थतज्ज्ञांनी इतका व्यापक विचार केला पाहिजे. देकार्तीय प्रतिमानाच्या अत्यंत संकुचित खिडकीतून

जगाकडे बघणे थांबवले पाहिजे. आवश्यक अशा व्यापक विचारांची वर जी संक्षेपाने मांडणी केली आहे तीतून अर्थमूलक विचारांचे अपुरेपण आणि घातकता अर्थतज्ज्ञांच्या लक्षात आली, तरी तो पुरेसा 'अर्थबोध' आहे असे तूर्तास म्हणता येईल!

दिलीप कुलकर्णी
कुडावळे, जि. रत्नागिरी

■■

---

**टीप :** अर्थबोध पत्रिकेच्या 'स्वदेशी व जागतिकीकरण' विशेषांकावरील प्रतिक्रिया म्हणून हा लेख प्राप्त झाला आहे.

# वाचकांचा प्रतिसाद

**अर्थबोध** पत्रिकेचे चारही अंक वाचताना क्षणोक्षणी असे जाणवत होते की आपण हे माध्यम विलक्षण योजनाबद्ध रीतीने सुरू करत आहात. त्यातील लेखांचे विषय जरी पाहिले तरी लक्षात येईल की आपल्याला भारतातील 'खऱ्या' औद्योगिक प्रगतीची आस लागली आहे. 'जहाजांची विल्हेवाट लावण्याचा घातक उद्योग', 'विकास व विस्थापन', 'स्वदेशी व जागतिकीकरण' या व इतर लेखांच्या वाचनामुळे माझ्यासारखा सामान्य वाचक फारच मोलाचे विचार प्राप्त करू शकतो. म्हणूनच वाटले की असे माध्यम आजच्या भरकटणाऱ्या माणसाला योग्य दिशा दाखवू शकेल.

काही सूचना :

(१) जानेवारी २००० पासून 'अर्थबोध पत्रिका' मासिक स्वरूपात नियमित प्रकाशित व्हावी. पुढे साप्ताहिक सुद्धा ! (२) या मासिकाची वार्षिक वर्गणी सर्वसामान्य बुद्धिजीवींना परवडेल अशी ठेवावी. - मंगेश नाबर, परळ, मुंबई.

**आपण** अर्थबोध पत्रिकेचे अंक विनामूल्य पाठवून अंक हवे असल्यास कळवावे म्हणून लिहिले आहे. मला अंक जरुर पाठवा पण फुकट नकोत. आपल्या देशांतील लोकांना सर्व काही फुकट घेण्याची सवय लागली आहे. कृपया आपण ती वाढवू नका. कुठल्याही फुकट दिलेल्या वस्तूला मोल नसते. मी अर्थशास्त्राचा विद्यार्थी नाही, तरीही आपण जे कार्य करीत आहात त्याबद्दल खरच कौतुक वाटते.

दिनकर राऊत, पास्ट प्युपिल्स असोसिएशन, बोर्डी.

**आपली** पत्रिका मिळाली. पत्रिकेत ज्या विषयांवर लेख प्रसिद्ध झाले आहेत ते खरोखरच बुद्धीला चालना देणारे आहेत. आपल्या लेखांमुळे जगात काय चांगलं आहे व आपले कसे नुकसान होत आहे, हे सुद्धा कळते.

· मनोहर गोलपेलवार

इंडियन इन्स्टिटट्युट ऑफ युथ वेलफेअर, नागपूर.

**अर्थबोध** पत्रिकेच्या 'स्वदेशी व जागतिकीकरण' विशेषांकात श्री. राजीव साने यांनी श्री. राजीव दीक्षितांवर केलेली टीका म्हणजे केवळ विरोधासाठी विरोध केल्यासारखा वाटतो. मी श्री. दीक्षित यांचा चहाता असलो तरी त्यांच्या सर्वच गोष्टींशी मी देखील सहमत नाही. त्यांच्यावर टीका जरूर करावी, पण ते जो स्वदेशीचा मुद्दा मांडत आहेत, त्यातील अतिरेकीपणा वगळता त्यात तथ्य आहे, असे वाटते. परदेशीवस्तूंचे आकर्षण व बहुराष्ट्रीय कंपन्यांचे अर्थव्यवस्थेवरील आक्रमण (विशेषतः ग्राहकोपयोगी वस्तू आणि जीवनावश्यक नसलेल्या पण चैनीच्या वस्तू) यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या रोजगारांच्या संधीला काही नुकसान पोचत आहे काय ? प्रगती, विकास, आर्थिक उलाढाल, अधिक परदेशी चलन, अधिक आयात-निर्यात व कदाचित अधिक 'एकूण राष्ट्रीय उत्पन्न' (GNP) या चक्रात माणूस भरडला जातोय, यामुळे अधिक हात बेकार होत आहेत, अनेक तरुणांमध्ये वैफल्याची भावना वाढतेय व परिणामस्वरुप गुन्हेगारीकडे तीच तरुणाई वळतेय. याचा विचार कधी आणि कोण करणार ? नर्मदा आंदोलनात मेधा पाटकर हेच सांगत आहेत, पण लक्षात कोण घेतो?

- नंदकिशोर भार्गवे, लातूर.

**अर्थबोध** पत्रिकेचे स्वरूप मला वाचनीय आणि विचाराला चालना देणारे वाटते आहे. एक नम्र सूचना - विषय आम्हां वाचकांना समजावतांना अभिनिवेष कमी आणि तर्कशुद्धता व शंभर टक्के सत्यावर आधारित युक्तिवाद असू दे. डावा/उजवा यातल्या रेषा अस्पष्ट झाल्या असून यापलीकडे बरेच वास्तव आज दिसते आहे आणि ते गुंतागुंतीचे आहे. आम्हांला ते समजून घेण्यासाठी विशुद्ध अर्थशास्त्रीय माहिती आणि विचार अपेक्षित आहे. मुख्यतः हवी निर्भेळ विश्वसनीयता. तीच आज दुर्मिळ झाली आहे. हे सर्व या विषयांचा विद्यार्थी म्हणून लिहिले. कोणत्याही अधिकाराने नव्हे.

विजय तेंडुलकर

विलेपार्ले, मुंबई

**'स्वदेशी व जागतिकीकरण'** ह्या महत्त्वाच्या विषयांविषयी फारच मोघमपणे, पुष्कळदा उथळपणे बोलले जाते. असे आपल्या अंकातील मजकूर वाचल्यावर वाटते. साधक-बाधक चर्चा असल्याने हा अभ्यासू अंक वाचनीय झाला आहे.

व्ही. जी. पेंढारकर, बान्द्रे (पू), मुंबई.

अर्थबोध पत्रिकेचे सन २००० या वर्षातील अंक
मिळण्यासाठी अर्ज

तारीख :

संपादक,
भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,
'अर्थबोध', ९६८/२१-२२,
सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६.

सस्नेह नमस्कार,

मला/आमच्या संस्थेला अर्थबोध पत्रिकेचे जानेवारी २००० ते डिसेंबर २००० या वर्षातील सर्व अंक हवे आहेत. त्यापैकी सहा अंकांचे देणगीमूल्य रूपये ५०/- (रु. पन्नास फक्त) डिमांड ड्राफ्टने / चेकने / मनीऑर्डरने / पोस्टल ऑर्डरने / रोख पाठविण्यात येत आहे. चेक / ड्राफ्टचा तपशील पुढील प्रमाणे :

---

---

(पुण्या बाहेरचा चेक असल्यास वटणावळीसाठी (कमिशनसाठी) पंधरा रुपये जादा पाठवावेत. चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, पुणे' या नावाने पाठवावेत.)

---

**टीप** -
- देणगीमूल्य व्यक्ती, संस्था, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये या सर्वांसाठी एकच आहे.
- या नमुना अर्जाच्या झेरॉक्स प्रती किंवा हस्तलिखित प्रतीद्वारे आपण देणगीमूल्य पाठवू शकता.
- आपल्या परिचितांमध्ये अशा प्रती वाटून किंवा आम्हाला त्यांचे पत्ते कळवून आपण, हा अंक अनेक वाचकांपर्यंत पोचविण्यास सहाय्य करू शकता.

अंक पाठविण्याचा पत्ता पुढीलप्रमाणे :

संबंधित व्यक्तीचे संपूर्ण नाव ______________________

______________________

संस्थेचे नाव ______________________

______________________

संस्थेशी असलेला संबंध ______________________

संपूर्ण पत्ता ______________________

______________________

______________________

गाव ______________________

तालुका व जिल्हा ______________________

पिन कोड ______________________

दूरध्वनी क्रमांक (एस टी डी कोडसह) ______________________

______________________

सही

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना :**

- इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ही संस्था प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. वि. म. दांडेकर यांच्या पुढाकाराने १९७० साली स्थापन करण्यात आली.

**उद्दिष्टे :**

- भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे;
- अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे;
- इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम :**

- संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते.
- संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.
- अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
- नोव्हेंबर १९९८ पासून 'अर्थबोधपत्रिका' प्रकाशित केली जात आहे.

**- संस्थेचे मंडळ -**

स. वा. कोगेकर • मृणालदत्त चौधरी • कुमुदिनी दांडेकर
आनंद नाडकर्णी • मनोहर भिडे • नीळकंठ रथ • के. एन्. राज
व्ही. एम्. राव • दि. चं. वधवा • सु. म. विद्वांस
ए. वैद्यनाथन • सत्यरंजन साठे • रामदास होनावर

# वाचक काय म्हणतात ?

- उद्‌बोधक माहिती असलेला ज्ञानवर्धक अंक
- मार्गदर्शक अंक
- विद्यार्थ्यांमध्ये जाणीव निर्माण करणारा अंक
- अभ्यासाव्यतिरिक्त इतर माहिती पुरविणारा दर्जेदार अंक
- आर्थिक व इतर कठीण विषय सोप्या शब्दांत मांडणारा अंक
- अभ्यासपूर्ण लेख असणारा अंक
- वाचनीय व संग्राह्य अंक
- ग्रामीण भागांत असे विषय पोचविण्याची गरज भागविणारा अंक
- समाज प्रबोधन करणारा अंक
- बुद्धिवादी वाचकांना आवडेल असा अंक
- जनजागृतीचे कार्य करणारा अंक
- स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शक अंक

**प्रेषक :**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**
'अर्थबोध',
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
पुणे - ४११ ०१६.
फोन : ५६५७१३२ / ५६५७२१०
ई-मेल : ispe@vsnl.com